परस्परं भावयन्तः

म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १०२ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०१५

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

**प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.**

वैशाख वणव्याच्या उन्हाळ्याच्या काहिलीमुळे आपण सर्व हैराण झालो आहोत आणि वर्षाऋतूच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहात आहोत. केरळात मान्सून दाखल झाला आहे, तो सक्रीय होऊन जूनच्या पहिल्या आठवड्यात येईल असे हवामान खाते सांगत आहे. हुलकावण्या देणारा पाऊस येवो तेव्हा येवो पण आपल्या मराठे परिवाराचा 'हितगुज' आपल्या दारी वेळेवर येईल आणि सुखद शिडकावा करील.

या अंकात, मराठे प्रतिष्ठानची मुहूर्तमेढ ज्यांनी रोवली ते प्रतिष्ठानचे आधारस्तंभ वयोवृद्ध श्री. ना. बा. मराठे यांचा 'माझा व्यासंग' लेख वाचून मन स्तिमित होते. त्यांच्या लेखन प्रपंचाला, त्यांनी केलेल्या महनीय कार्याला आपल्या समस्त मराठे परिवाराचे अभिवादन, ना. बा. आपल्याला आमचे शत शत प्रणाम! जून महिना हा बालगंधर्वांचा जन्ममास. भाऊ मराठे यांचा 'बालगंधर्व : एक स्मरण' हा लेख निश्चितच आवडेल.

आणखी एक वाईट वाटणारी, मनाला दुःख देणारी गोष्ट म्हणजे आपल्या कुलभगिनी, 'हितगुज'च्या लेखिका मराठे प्रतिष्ठानवर लोभ ठेवणाऱ्या, वाचकांचा पत्रव्यवहार करणाऱ्या, सरगम संगीत विद्यालयाच्या संस्थापिका, प्राचार्या, संचालिका सौ. वर्षा नंदलाल गोडबोले ह्यांचे दुःखद निधन दि. २५ जानेवारी २०१५ ला झाले. दूरध्वनीवर आता त्यांचा मंजूळ स्वर ऐकायला मिळणार नाही. 'हितगुज'चे मन भरून कौतुक करण्यासाठी, काही सांगण्यासाठी सौ. वर्षाताई नेहमी दूरध्वनी करीत असत. मराठे परिवार, एका सुश्राव्य गाणाऱ्या गायिकेला, संगीत शिकविणाऱ्या मार्गदर्शक सौभाग्यगुरूला पारखा झाला आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

नवचैतन्य प्रकाशनचे प्रकाशक श्री. शरद मराठे आणि सौ. सुप्रिया मराठे यांना 'उद्योगरत्न' पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. तेव्हा बोरिवलीला श्रीकृष्ण नगर सभागृहात, विभागीय मेळाव्याला रविवार दि १४. जूनला आवर्जून या, असो.

आपली शुभचिंतक,
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(पृ.१२०)

## मराठे परिवार गोवा-वार्षिक सभा

मराठे प्रतिष्ठानच्या गोवा शाखेचे अर्थात मराठे परिवार, 'गोवा' यांचे वार्षिक स्नेह संमेलन दि. २६ एप्रिल २०१५ रोजी ढवळी, गोवा येथे ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य श्री. कालीदासजी मराठे यांच्या घरी संपन्न झाले. २-३ माहेरवाशिणिंसह प्रामुख्याने स्त्रियांचा विशेष सहभाग असलेल्या या स्नेह संमेलनास अंदाजे ५० जणांनी उपस्थिती लावली. काही तरुण तरुणींनीही हजेरी लावली असली तरी तरुणांचा सहभाग विशेष समाधानकारक नव्हता व तो कसा वाढवता येईल याविषयीच प्रामुख्याने चर्चा झाली. सविस्तर वृत्त पुढील अंकात.....

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : **parbhakar.marathe@gmail.com**
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# मराठे उद्योग षष्ठ्यब्दीपूर्ती समारोह

(आप्पासाहेब, सुरेशभाऊ, यशवंत व वसंत, ओम मराठे) पृ. क्र. ३९९




पं. वसंतराव गाडगीळ श्री. वसंतराव व त्यांचे चिरंजीव श्री. ओम यांना शुभाशिर्वाद देताना

प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य असलेले कै. श्री. सुरेशभाऊ मराठे यांच्या मराठे उद्योग या संस्थेच्या स्थापनेस ६० वर्षे पूर्ण झाल्याचा सोहळा नुकताच नाशिक मध्ये साजरा झाला. विशेष म्हणजे, अप्पासाहेब, सुरेशभाऊ, त्यानंतर यशवंत आणि वसंत या तीन पिढ्यांनंतर ओम या चवथ्या पिढीतल्या 'मराठ्या'ने पुढाकार घेऊन आपल्या पणजोबांनी सुरु केलेल्या व त्यानंतरच्या पिढ्यांनी वाढवलेल्या या उद्योगाच्या ६० वर्षाच्या कारकीर्दीचा आढावा घेणारा एक हृद्य सोहळा नाशिक मध्ये आयोजित केला होता.

१९५५ साली कै. श्री. अप्पासाहेब मराठे यांनी स्थापन केलेल्या 'सचिन अँड कंपनी'ने जहाजांवर लागणाऱ्या दिव्यांच्या उत्पादनास सुरुवात केली. तसेच प्रीमियर ऑटोमोबाईल साठी सुटे भाग ही बनवीत असत. परंतु २८ ऑगस्ट १९६९ला अप्पासाहेबांच्या निधनानंतर कै सुरेशभाऊंच्या खांद्यावर 'मराठे उद्योग'ची धुरा आली. त्यांनी आपले मेहुणे नारायणराव केळकर यांच्या तांत्रिक सहकार्याने, १९७२ साली भारतात पहिल्यांदा, Small Offset Printing Machinesचे उत्पादन करण्याची मुहूर्तमेढ रोवली. ही Swift Mini Offset मशीन्स म्हणजे भारतातील छपाई उद्योगाचा पायाच होता. आपल्या उत्पादन कौशल्यामुळे या क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनी म्हणून 'मराठे उद्योग'चा नावलौकिक होता. त्यामुळे गेल्या ४५ वर्षात आजपर्यंत अशी दहा हजारपेक्षा अधिक मशीन्स देशात आणि देशाबाहेर विकली गेली आहेत. आताचा 'Make in India'चा नारा तेव्हा नव्हता. त्यामुळेच आयातीला पर्यायी तंत्रज्ञान विकसित केल्याबद्दल राष्ट्रीय पुरस्कारही १९७८ साली 'मराठे उद्योग'ला मिळाला.

या तिसऱ्या आणि त्यानंतर चवथ्या पिढीने बदलत्या काळाची पावले ओळखून, या क्षेत्रातील 'मराठे उद्योगा'चे स्थान अबाधित राखण्याच्या दृष्टीने व ग्राहकांच्या बदलत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अनेक नवीन प्रकारचे तंत्रज्ञान अंगीकारले आहे. या वर्षीच म्हणजे २०१५ मधेच, Variable Data Printing मशीन्सचे उत्पादन सुरु केले ज्यायोगे Mass Customization, numbering, bar-coding सारख्या आधुनिक काळाच्या गरजा सफाईने पूर्ण होऊ शकल्या. ह्या VDP मशीन्सचे उत्पादन करताना पूर्वापार चालत आलेल्या Offset technologyची सांगड digital technology शी घातली आहे. त्यामुळे ही मशीन्स इतर प्रस्थापित मशीन्स पेक्षा वापरायला सोपी व अतिशय किफायतशीर ठरतात. विविध प्रकारच्या ग्राहकांच्या गरजा ओळखून, कागदाचे विविध sizes सुयोग्य रीतीने हाताळणारी ह्या मशीन्सची ४ models कंपनीने बाजारात आणली आहेत. VDP Mini, VDP Compact, VDP Surya आणि VDP Max.

कंपनीच्या एक संचालिका व श्री. वसंत मराठे यांच्या सुविद्य पत्नी कै सौ. स्वाती यांच्या नुकत्याच (मागील वर्षी) झालेल्या निधनाचा आघात सहन करूनही कंपनीच्या वाटचालीत कोणताही खंड पडू न देता या नव्या मशीनचे सादरीकरण करून ग्राहकांप्रती असलेल्या आपल्या दायित्वाची पूर्तता करून 'मराठे उद्योगा'ने एक वेगळाच आदर्श घालून दिला आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने मराठे कुटुंबीय, कर्मचारी वृंद या व्यतिरिक्त 'मराठे उद्योग'च्या जवळ जवळ १०० सप्लायर्स, ग्राहक व वितरकांचा एक मेळावाच भरला होता. या सोहळ्याची खासियत म्हणजे मराठे कुटुंबाचे हितचिंतक आणि संस्कृत भाषेचे पंडित श्री वसंतराव गाडगीळ यांची उपस्थिती व त्यांनी उपस्थितांना संस्कृत मधून केलेले मार्गदर्शन.

जुन्या स्मृतीना उजाळा देत, 'मराठे उद्योग'च्या तीन पिढ्यांनी केलेल्या ६० वर्षांच्या या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या या सोहळ्याच्या निमित्ताने, आता या अवाढव्य उद्योगाची धुरा चवथ्या पिढीचा प्रतिनिधी व श्री. वसंत मराठे यांचा पुत्र श्री. ओम याने खांद्यावर घेतली आहे. ओम व सर्वच मराठे कुटुंबियांचे प्रतिष्ठानच्या वतीने हार्दिक अभिनंदन व उत्तरोत्तर 'मराठे उद्योग' नवी क्षितीजे पादाक्रांत करो ह्या सदिच्छा!

प्रेषक – **श्री. श्रीनिवास अनंत मराठे**
(पृ.क्र.३९२), शिवाजीपार्क, दादर
मोबाइल – ९८३३२१६४६८

❖

# मधुमेह (Diabetes)
## मधुमेह म्हणजे काय? (अतिसंक्षिप्त रूपात)

निरोगी माणसाच्या रक्तात साखरेचे प्रमाण योग्य व मर्यादित प्रमाणात राहते. म्हणजेच – उपाशीपोटी – ८० ते १२० mg/१००cc मधुमेही व्यक्तीमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण बरेच वाढलेले असते हे सर्वश्रुतच आहे.

उदरपोकळीत जठराच्या मागे स्वादुपिंड (Pancrea) नावाची एक मोठी ग्रंथी असते. कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ ह्यांच्या पचनास आवश्यक असणारा पाचकरस ही ग्रंथी निर्माण करते. ह्याशिवाय 'इन्शुलिन' ह्या अंतःस्रावाची निर्मिती करते. इन्शुलिनच्या सर्व कार्याचा एकत्रित परिणाम म्हणजे रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण मर्यादित ठेवणे.

मधुमेही व्यक्तींमध्ये स्वादुपिंडाचे कार्य बिघडलेले असते आणि इन्शुलिनच्या न्यूनतेमुळे रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण वाढते. ही न्यूनता आंशिक असेल किंवा संपूर्ण असू शकेल. आणि ह्यावरूनच मधुमेह सौम्य वा तीव्र स्वरूपाचा ठरविला जातो.

रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण मूत्राशयाच्या ग्लुकोजच्या उत्सर्जनक्रियेच्या मर्यादेबाहेर गेले की, लघवीतील ग्लुकोजचे प्रमाण वाढते. त्याबरोबरच पाणी, सोडियम, पोटॅशियमसारखी खनिजेही शरीराबाहेर अधिक प्रमाणात विसर्जित होतात.

ही प्राथमिक माहिती मधुमेही माणसास असली म्हणजे उपचाराची मूलभूत तत्त्वे व आहारविषयक पथ्य तो डोळसपणे पाळू शकतो. कृश मधुमेही व्यक्तीने पौष्टिक आहार घ्यावा. मात्र साखर, गूळ, मिष्टान्ने, लोणी, तूप, तेल, गोड फळे, मांस, नवे धान्य ही वर्ज्य आहेत असे आयुर्वेदात म्हटले आहे. स्थूल व्यक्तीने अधिक प्रमाणात डाएटिंग व व्यायाम करून वजन कमी करावे म्हणजे मधुमेहाव्यतिरिक्त इतर आजार होणार नाहीत. डाएटिंग म्हणजे पोट रिकामे ठेवणे नव्हे, तर आहारामुळे रक्तशर्करा व चरबी वाढून देऊ नये. मधुमेहींनी आपला आहार नक्कीच इतरांपेक्षा वेगळा ठेवावा. मधुमेहींनी स्वतःचा औषधोपचार, रोगाची तीव्रता आणि शरीराची दैनंदिन हालचाल व व्यायाम यांचा विचार करून अन्नपदार्थ ग्रहण करावेत. मी काही खाद्यपदार्थ त्यांच्याकरता सुचवीत आहे. रुचिवैविध्यासाठी नेहमीचे पदार्थ सोडून इतर काही सुचविले आहेत.

कृत्रिम गोडी आणणारे, साखरेव्यतिरिक्त काही पदार्थ, म्हणजे सॅकरिन, सायक्लॅमेट, ॲसिसल्फेट, पोटॅशियम, ॲस्पार्टेम, थॉमॅटिन, फ्रुक्टोज, सॉर्निटॉल व झायलिटॉल यांचा वापर मी केला आहे. आपणही करू शकता. साखर व गुळ अत्यल्प प्रमाणात खावेत. म्हणजे दिवसा जास्त खाल्ले तर संध्याकाळी पूर्ण वर्ज्य करावेत. आहारानुसार रक्तातील साखरेचे प्रमाण कमी अधिक होऊ शकते व त्याप्रमाणे औषधाचे प्रमाण बदलावे लागते. आहार व औषधे यांचा समतोल राखावा लागतो. वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला व रक्तपासण्या करून घ्याव्या.

मधुमेही व्यक्तींस साखर, गूळ वर्ज्य असले तरी त्यांस गोड पदार्थ खाण्याची इच्छा होतेच. काहींना तर गोडच पदार्थ आवडतात. त्यांच्याकरता मी काही पदार्थ सुचवीत आहे. आणि विशेष म्हणजे ते साखरेशिवाय करता येतात.

**१) गाजर हलवा**

*साहित्य :* ३ वाट्या किसलेले गाजर, २ चहाचे चमचे तूप, ४ कप टोन्ड दूध, अर्धा चहाचा चमचा वेलदोडे पूड, सॅकरिन गोळ्या – एकूण ६ गोळ्या (सॅकरिन लिक्विड रूपातही येते).

*कृती :* पातेल्यात तूप गरम करून गाजराचा कीस घालून परतावा. थोडा शिजल्यावर त्यात दूध घालून पुन्हा शिजत ठेवावा. दूध थोडे आटते. कोमट झाल्यानंतर सॅकेरिनच्या गोळ्या पूड करून मिसळाव्या. त्याचप्रमाणे वेलदोडे पूडही मिसळावी. गाजर हलवा तयार झाला.

**२) नाचणीची खीर**

*साहित्य :* १ वाटी नाचणी रात्री भिजत घालावी. सकाळी मिक्सरमधून वाटून घ्यावी, २ वाट्या नारळाचे दूध (दाट असावे), ४ बारीक पूड केलेल्या सॅकरिनच्या गोळ्या, अर्धा चमचा वेलची पूड, पाव चमचा जायफळ पूड.

*कृती :* नाचणीचे वाटण व नारळाचे दूध एकत्र करून मध्यम आचेवर शिजवावे. ढवळत राहावे. घट्टसर झाले की आच बंद करावी. त्यात वेलची पूड, जायफळ पूड व सॅकरिनच्या गोळ्यांची पूड घालून पुन्हा ढवळावे. नाचणीची खीर तयार झाली.

**३) पमकिन जेली**

*साहित्य :* १ मोठा चमचा जिलेटिन, २ मोठे चमचे संत्र्याचा रस, १ कप शिजवून मऊ केलेला लाल भोपळ्याचा रस, ४ थेंब सॅकरिन, १/२ चमचा दालचिनी पावडर, १ चिमूट सूंठ पावडर, १ चिमूट जायफळ पावडर.

*कृती :* ऑरेंज ज्यूसमध्ये जिलेटिन भिजत ठेवावे. भोपळ्याचा गर, सॅकरिन, जायफळ, सुंठ पावडर, जिलेटिन मिश्रणामध्ये

घालून चांगले ढवळावे व फ्रीजमध्ये सेट होण्याकरता ठेवावे. सर्व्ह करताना वरून दालचिनी पावडर भुरभुरावी.

**४) सीताफळाचे आइस्क्रीम**

*साहित्य :* १० कप दूध, (2½) अडीच मोठे चमचे कॉर्नफ्लोअर, अडीच कप सीताफळाचा गर, १० थेंब सॅकरिन, १ चहाचा चमचा जिलेटिन पूड,

*कृती :* पाव कप दुधात कॉर्नफ्लोअर घालून ढवळावे. पाच मिनिटे उकळल्यावर आचेवरून उतरावे. एक कप दुधात जिलेटिन पूड घालून विरघळावी. उरलेले दूध गरम करावे व तिन्ही मिश्रणे एकत्र करावीत. थंड झाल्यावर त्यात सीताफळाचा गर मिसळून मिक्सरमधून काढावे. नंतर त्यात सॅकरिनचे थेंब घालून डावाने ढवळावे व फ्रीजमध्ये गोठविण्यास ठेवावे. आइस्क्रीम तयार होते.

मधुमेही व्यक्तींनी रोजच्या आहारामध्ये काही नियम पाळायचे असतात. त्याबद्दल काही महत्त्वाच्या टिप्स मी देत आहे.

१) मधुमेहींनी नाश्त्याकरता साधेच, साखर व तेलविरहित पदार्थ खावेत. लोणी, चीज, पनीरचा वापर करू नये. कृशता असल्यास अत्यल्प प्रमाणात स्निग्ध पदार्थ घ्यावेत.
२) चायनीज पदार्थ खाण्यास योग्य आहेत. त्यांत भाज्या, जीवनसत्त्वे भरपूर असतात. कॅलरी व्हॅल्यू कमी असून पचण्यास सोपे.
३) एकदाच भरपूर जेवण्याऐवजी थोडे थोडे एकेका वेळी खावे.
४) तळलेले पदार्थ वर्ज्य आहेत. तसेच लोणची, चिप्स, खारे दाणे टाळावेत.
५) व्हेज सूप्सची कॅलरी व्हॅल्यू कमी असून, घट्टसर केल्यास त्यात एक वेळचे जेवण होऊ शकते. कोशिंबिरी खाव्या – काकडी, टोमॅटो, कांदा, पालक वगैरे वापरावे. सॅलड, मोड आलेली धान्ये, हिरव्या भाज्या, फायबर असलेले पदार्थ खावेत.
६) पिष्टमय पदार्थ – बटाटा, रताळे, अर्वी, साबुदाणा, सुरण टाळावा. त्याऐवजी प्रथिने असलेली कडधान्ये, उसळी, टोन्ड मिल्क यांचा अधिक वापर करावा
७) जेवणाच्या मधल्या वेळात १–२ ताजी फळे खावीत.
८) मधुमेही आहार म्हणजे ‘बेचव जेवण’ ही समजूत चुकीची आहे. आहार वैविध्यपूर्ण व रुचकर असणे सहज शक्य आहे.

सौम्य तऱ्हेचा मधुमेह असल्यास योग्य आहार व नियमित व्यायाम यांच्यायोगे पूर्णपणे बरा होतो. तीव्र स्वरूपाचा असल्यास आहार व व्यायाम यांमुळे सुसह्य होतो. इतर रोग होण्याची शक्यता राहत नाही.

**– डॉ. श्रीमती सीमा श्याम मराठे**
(पृ.क्र.४११) ‘संकल्प बंगला’,
प्लॉट नं. १२९, स. नं. ७८,
भुसारी कॉलनी, पौड रोड, कोथरूड,
पुणे – ४११०३८
दूरध्वनी : ०२०–२५२८०३०९
मोबाइल : ७५०७९१२९०६

## वाचकांचा पत्रव्यवहार

माननीय महोदया,

हितगुजचा १०० वा अंक वेळेत मिळाला. शंभराव्या अंकाबद्दल बरीच उत्सुकता होती. त्या दृष्टीने अंक चांगलाच निघाला आहे. १०० व्या अंकापर्यंतची ‘हितगुज’ची वाटचाल व अनेकांनी तो आजच्या स्थितीला आणण्यात घेतलेले कष्ट खरोखर वाखाणण्याजोगे आहेत. प्रथमत: संपादकपदाची धुरा सांभाळणारे ल.शं. यांच्या संपादनकौशल्याची व आर्थिक आखणीची म्हणजे सभासद वाढवणे, वर्गणी ठरवणे इ. बाबतची माहिती वाचनीय आहे व त्यामुळे हितगुजचा प्रवास नजरेसमोर येतो.

अंकातील इतरही मजकूर चांगलाच आहे.

ज्या सभासदांनी रु. २००० भरले आहेत त्यांना त्याचप्रमाणे ज्यांनी अजून पूर्ण रक्कम भरली नाही त्या सर्वांना हा १०० वा अंक पाठविला आहेच. तो वाचून अनेक जण उर्वरित रक्कम पाठवतील असे वाटते. तरीपण ज्यांनी अजून पूर्ण रक्कम पाठवली नाही त्यांना वैयक्तिक पत्र (आंतर्देशीय) पाठवावे असे वाटते.

प्रतिष्ठानची वेबसाईट तयार होणार होती, ती झाली की नाही ते कळले नाही. श्री. हेमंत मराठे यांच्याशी मध्यंतरी फोनवर बोलणे झाले होते. त्याप्रमाणे सौ. गायत्री लेले यांना नुकताच हितगुजचा अंक मिळाला आहे. आपल्या संपादनाखाली असेच चांगले चांगले अंक निघोत!

**– वि. म. मराठे,**
(पृ.२३५), सांगली,
दूरध्वनी : (०२३३) २३०००७२
भ्रमणध्वनी : ९४२०६७८९६५

# माझा व्यासंग

**व्या**संग म्हणजे काहीतरी आवडीने करीत राहणे! अकॅडेमिक शिक्षण, नोकरी, व्यवसाय, संसार यांव्यतिरिक्त काहीतरी वेगळे! आता माझा व्यासंग काय आहे याची थोडीशी कल्पना देतो. वस्तुतः ते अप्रस्तुत आहे तथापि प्रसंगोपात्त त्याला महत्त्व आहे हे समजून घ्यायला हरकत नाही.

प्रथमतः मला हे नमूद करायला हवे की आपल्या गुरुची प्लॅटिनम-ज्युबिली (पंचाहत्तर वर्षे) झाल्याचा गौरव. स्वामी केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे पं. नारायणशास्त्री मराठे) प्राज्ञ पाठ शाळेचे संस्थापक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरु, यांचा १९५२ साली निवृत्त सरन्यायाधीश प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य समारंभ करण्यात मी पुढाकार घेतला होता. त्या निमित्ताने एक गौरवग्रंथही काढण्यात आला होता. संपादकीय मंडळीत ना. बा. मराठे हे नाव घातलेले पाहिले आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण त्या वेळी एक पोरसवदा विद्यार्थी यापलीकडे माझी काहीच ओळख नव्हती. पण या गोष्टीचा मला आयुष्यभर फायदा झाला त्यातून प्रेरणा मिळाली आणि अशा कार्याचा जणू मी वसाच घेतला.

कलकत्ता महाराष्ट्र मंडळाला पन्नास वर्षे झाल्याचे माझ्या लक्षात आले आणि तयारीला लागलो. त्या वेळी श्री. अण्णा कुलकर्णी नावाचे मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांना सविस्तर पत्र लिहून मंडळाचा सुवर्णमहोत्सव झाला पाहिजे असा आग्रह धरला. अनेकांशी बोललो. अखेर मंडळाचा सुवर्णमहोत्सव मोठ्या दिमाखदार रितीने साजरा झाला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक सपत्नीक समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, प. बंगालचे तत्कालीन मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांचीही समारंभाला हजेरी होती. या निमित्ताने ‘स्मरणिका’ काढण्याचे ठरवले आणि ती काढण्यात अर्थातच माझा पुढाकार होताच. या निमित्ताने वसंतरावांनी ५१ सहस्र रुपयांच्या देणगीचा धनादेश मंडळाला दिला. ही घटना १९७४ सालची. तेव्हापासून मंडळामार्फत आम्ही ‘सागर’ नावाचे वार्षिक काढायचे ठरवले आणि सुरूही केले. ते अजूनपर्यंत निघत आहे.

दुसरे महत्त्वाचे कार्य माझ्या हातून घडले ते म्हणजे प्रा. डी. आर. भांडारकर (देवदत्त रामकृष्ण भांडारकर) यांच्या जन्मशताब्दीचा कार्यक्रम घडवून आणला. देवदत्त हे आर. जी. भांडारकर (रामकृष्ण गोपाळ भांडारकर) यांचे चिरंजीव. १९२०-३५ दरम्यान कलकत्ता विश्वविद्यालयात ‘प्राचीन इतिहास’ या विषयाचे प्राध्यापक होते. मंडळाच्या स्थापनेत तेही एक सदस्य होते. शताब्दी महोत्सव करण्याचे ठरवले आणि त्यानिमित्त एक ग्रंथच प्रकाशित केला. त्यात अनेक विद्वानांचे लेख छापले होते. म. म. न.वि.मिराशी यांनीही आवर्जून लेख पाठवला होता. या कार्यक्रमाला बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंतराव साठे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनी ५० सहस्र रुपयांची देणगी दिली. मंडळाने त्यात भर घालून, प्राचीन इतिहासाचे अध्यासन (Chair) उभारण्यासाठी रु. १ लाखाची देणगी कलकत्ता विश्वविद्यालयास दिली. महोत्सवासाठी काढलेल्या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्राचे तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात त्यांच्याच हस्ते करण्यात आले. तसेच डॉ. देवदत्त भांडारकर यांचे एक तैलचित्र बनवून त्याच्या प्रतिकृती पुणे विद्यापीठ, भारत इतिहास संशोधन मंडळ-पुणे आदी ठिकाणी देण्यात आल्या.

आणि या गोष्टी इथे नमूद करणे अप्रस्तुत होणार नाही असे वाटते कारण त्या सहजी लक्षात येण्यासारख्या नाहीत किंवा त्या लोकांना फारशा माहीत नाहीत. एक म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या ८५व्या वाढदिवशी त्यांना सादर केलेला गौरवग्रंथ ‘प्रज्ञांजली’! अनेक प्रज्ञावंतांचे लेख मागवून तो संपन्न केला म्हणून हे समर्पक नाव! डॉ. रा.ना. दांडेकर यांची त्या ग्रंथाला प्रस्तावना लाभली आहे एवढे सांगितले की त्याची महती कळावी. आणि दुसरा असा ग्रंथ म्हणजे ‘प्रमोदसिंधु’! डॉ. प्रमोद लाळे यांच्या ७५व्या वाढदिवशी २००३ मध्ये सकाळचे तत्कालीन संपादक श्री. अनंत दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली भांडारकर संस्थेच्या सभागृहात त्याचे विमोचन झाले. डॉ. लाळे हे उस्मानिया विश्वविद्यालयात संस्कृतचे प्राध्यापक होते. व्यासंगाची एवढी प्रमुख उदाहरणे येथे पुरेशी आहेत ना?

आणखी एक-दोन प्रमुख घटनांचा उल्लेख करावासा वाटतो. तो

म्हणजे १९९६ मध्ये गोमंतक मराठी अकादमीतर्फे डॉ. घवी यांनी संपादित केलेल्या 'ग्रंथसूची' या गोमंतकीय मराठी ग्रंथांच्या सूचीचा प्रकाशन समारंभ. या समारंभाला अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली होती आणि गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. प्रतापसिंह राणे उद्घाटक होते. हा कार्यक्रम दूरदर्शनवर पण दाखवण्यात आला होता. पुणे म.न.पा. द्वारे ऋषितुल्य अशा ११ आदरणीय व्यक्तींचा हा सत्कार दर वर्षी केला जातो. २ सप्टेंबर २०११ला ऋषिपंचमीच्या दिवशी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात झालेला माझा भव्य सत्कार ही ती दुसरी घटना! या समारंभाला डॉ. भटकर, डॉ. शं. गो. मुजुमदार, डॉ. विश्वनाथ कराड हे मुख्य अतिथी होते. त्यांच्या हस्ते शाल, फेटा, श्रीफळ, म.न.पा.चे मानचिन्ह आणि अनेक उपहार देऊन कालोचित सन्मान झाला. ही सारी गुरुकृपाच नाही तर दुसरे काय?

माझ्या व्यासंगाचाच भाग असलेल्या माझ्या लेखनप्रपंचामुळे माझे ठिकठिकाणी सत्कार झाले असले तरी त्यांविषयी इथे लिहिणे अप्रस्तुत वाटते. तरीही एक प्रासंगिक उदाहरण देऊन ही गाथा(!) पूर्ण करतो. १९७२ साली, 'संदर्भसेवा आणि संदर्भसाहित्य' आणि 'ग्रंथसूचिशास्त्र' अशी दोन क्रमिक पुस्तके 'महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघा'ने माझ्याकडून लिहवून घेऊन प्रकाशित केली जी आता दुर्मिळ आहेत. पैकी 'ग्रंथसूचिशास्त्र' या पुस्तकासाठी संघाने मला पारितोषिक दिले होते. अमरावती येथे भरलेल्या राज्य ग्रंथालय संघाच्या अधिवेशनात दिलेल्या या पारितोषिकाने मला महाराष्ट्रात नाव आणि कीर्ती मिळवून दिली याचे भान मला आहे. धन्यवाद!

**– ना. बा. मराठे,** (पृ.क्र.५५९)
कोथरूड, पुणे–४११०३८

---

# संवाद कुलबांधवांशी

नमस्कार,

मार्च २०१५ चा रुपडे बदललेला 'हितगुज' आपण वाचला असेलच. अंक वाचून लगेचच काही प्रतिक्रिया मोबाइलवर मिळाल्या, त्यामुळे आमचा हुरूप वाढला. काही नवनवीन कल्पना सुचू लागल्या. त्याला मूर्त रूप आल्यावर आपल्यापुढे येईलच.

आपण जो विद्यार्थी गुणगौरव करतो त्यामध्ये आकर्षकता येण्यासाठी आम्ही बक्षिसांची रक्कम वाढविली आहे. त्याची सविस्तर माहिती मागील अंकामध्ये आहेच. तेव्हा विद्यार्थ्यांनो, निकाल लागल्यावर लगेच आपला अर्ज आपल्या वेबसाइटवर अपलोड करा. ही सोयदेखील आपण करून दिली आहे. अर्ज शक्यतो मुलांना करण्यास सांगावे, आणि कार्यक्रमास विद्यार्थ्यांना घेऊन यावे, त्याद्वारे मुलांचा प्रतिष्ठानशी संपर्क वाढेल.

आपली वेबसाईटदेखील नवीन स्वरूपात तयार केली आहे, अक्षयतृतीयेदिनी ती सुरू केली आहे. सध्या ती इंग्रजीमध्ये आहे. आपल्या सूचनांचा विचार करून गरज असलेले बदल केले जातील. काही महिन्यांत ती मराठीमध्येदेखील तयार होणार आहे.

सभासद बंधुभगिनींनो, आपणांस सांगण्यास आनंद होतो की, आपले सन्माननीय सभासद, निर्माण ग्रुपचे संचालक श्री. अजित मराठे पुरस्कृत उद्योग पुरस्कार, यंदा आम्ही जाहीर करत आहोत. नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली–मुंबईचे श्री. शरद मराठे आणि सौ. सुप्रिया मराठे यांना हा पुरस्कार वितरण करण्यासाठी म. प्र. चा विभागीय मेळावा दि. १४ जून २०१५ रोजी सकाळी १० ते दु. २ पर्यंत बोरिवली– मुंबई येथे आयोजित केला आहे. या मेळाव्याचे निमंत्रक आहेत आपले सभासद निवृत्त न्यायमूर्ती श्री. दिलीप मराठे. श्रीकृष्णनगर सोसायटीच्या हॉलमध्ये, बोरिवली (पूर्व) नॅशनल पार्कच्या बाजूला हा कार्यक्रम होईल. आपणां सर्वांना आग्रहाचे आमंत्रण आहे. आपण सर्व जण मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

अशाच नवीन नवीन गोष्टी आपण करत आहोत, यापुढेही करणार आहोत, आपल्या सहकार्याची आणि सहभागाची मात्र नितांत गरज आहे. आपले सहकार्य आणि सहभाग असाच राहील, नव्हे वृद्धिंगत होईल ही इच्छा. आता आपला निरोप घेतो. पुढील भेट सप्टेंबरच्या अंकात.

**– हेमंत अरुण मराठे**
(पृ. २१) नालासोपारा
भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/
९८२०६९९९५७

# समाजकार्य : एक आफत

**गां**धी जन्मशताब्दीचे वर्ष संपले आणि मध्यावधी निवडणुकांचे वारे जोरात वाहायला लागले. सरकार व पुढारी एकदम जागे झाले. खेड्यापाड्यातील मते मिळविण्यासाठी ग्रामोद्धार करण्याची अहमहमिका चालू झाली. ग्रामोद्धाराची पहिली पायरी म्हणजे कुटीरोद्योग! त्याच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी ग्रामलक्ष्मींच्या नेमणुका ताबडतोब करण्यात आल्या. ग्रामलक्ष्मींना उत्कृष्ट कामासाठी बक्षिसेही ठेवण्यात आली.

अशाच एका सुप्रभाती शकुंतला यादव नावाची ग्रामलक्ष्मी महिला मंडळाच्या सेक्रेटरीचा पत्ता शोधत माझ्या घरी आली. अंगाने जाडजूड, डोळ्याला गॉगल, काळ्या रंगाला मॅचिंग पांढरी साडी, लक्ष्मीला साजेसा कुंकवाचा मोठा टिळा, हातात पर्स व फायली असा तिचा अवतार पाहून ती 'लाल त्रिकोणा'ची प्रचारिका आहे हे मी ओळखले. तिच्या व्याख्यानातून सुटका करून घेण्यासाठी आमच्या मंडळातील सर्व स्त्री सभासद सुशिक्षित आहेत व त्या कुटुंबनियोजनाचे महत्त्व जाणतात तेव्हा आपण तसदी घेण्याचे काहीच कारण नाही असे मी तिला सांगितले. हे माझे गोड शब्द ऐकून ती हसली आणि तिने मला आपले ओळखपत्र व एक लखोटा दिला.

मी लखोटा उघडून आतील पत्र वाचले. ते समाजकल्याण खात्याच्या अधिकाऱ्याचे पत्र होते. 'सेक्रेटरी, महिला मंडळ यांना, आपल्यासारख्या सुशिक्षित महिला खेडेगावात राहून स्त्रियांना जीवनोपयोगी शिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत याबद्दल अभिनंदन! आपल्या कॉलनीत शिवणक्लास सुरू करण्याबाबतचे एक वर्षापूर्वी पाठविलेले पत्र मिळाले. सध्या आमच्या खात्यामार्फत पूर्वी सुरू असलेली स्कीम बंद केलेली आहे. त्याऐवजी स्त्रियांना संसारोपयोगी घरगुती उद्योगधंद्याचे शिक्षण देण्याची योजना आहे त्यासंबंधी माहिती देण्यासाठी ग्रामलक्ष्मी पाठविली आहे. तिला कृपया सहकार्य द्यावे ही विनंती.'

हे पत्र वाचून मी तिला विचारले, 'आपण कोणकोणत्या गोष्टी शिकवता?'

'स्त्रियांना नित्योपयोगी असलेली स्नो, पावडर, कुंकू, काजळ, सुवासिक तेल, उटणे इ. प्रसाधने व वासाचे साबण, कपड्याचे साबण, उदबत्या इ. गोष्टी मी सप्रयोग शिकवते', तिने उत्तर दिले.

तिची ही आगगाडीच्या डब्यांप्रमाणे लांब असलेली यादी ऐकून मला जरा बरे वाटले. दर बुधवारी असणाऱ्या मीटिंगसाठी महिला मंडळाचे कार्यक्रम ठरविणे व आठवड्यातील एक दिवस साजरा करणे याचा प्रश्न थोडे दिवस तरी सुटणार होता. मलाही मंडळाची सेक्रेटरी म्हणून काहीतरी उपयुक्त कार्य करीत असल्याचे समाधान मिळणार होते. सर्व वस्तू मोफत म्हणजे सरकारच्या खर्चाने शिकवल्या जाणार होत्या. त्यामुळे मंडळावर खर्चाचा भार पडणार नव्हता. असा हा मणिकांचन योग अगदी अनपेक्षितपणे जुळून आला होता.

मी तिला विचारले की, तुम्ही यांपैकी प्रथम कोणत्या गोष्टी शिकवणार?

'स्त्रिया मेकअप करण्याआधी सुवासिक साबणाने तोंड धुतात. तेव्हा आपण सुवासिक साबणापासून सुरुवात करू या.'

मी तिला दुसऱ्या दिवशी दुपारी ठीक ४ वाजता मंडळात येण्यास सांगितले. सगळ्या सभासदांना तातडीची नोटीस देऊन ४ वाजता मंडळात येण्याची सूचना दिली. 'समाजकल्याण खात्यातर्फे ग्रामलक्ष्मी शकुंतला यादव या आपल्याला सुवासिक साबण कसे तयार करावयाचे हे सप्रयोग दाखविणार आहेत. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे व या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.'

मंडळाचा कार्यक्रम डोक्यात घोळत असल्यामुळे रात्री स्वप्नामध्येसुद्धा पेपरमधील लक्स, हमाम अशा सुवासिक साबणांच्या जाहिराती चित्रपटाप्रमाणे डोळ्यांसमोरून सरकत होत्या. मोहक रंग असलेली लक्सची वडी आणि तिच्या शेजारीच सिमी गरेवालचा नाजूक पोजमध्ये घेतलेला फोटोही होता. हमामच्या जाहिरातीत नुकतेच न्हाऊन तरतरीत झालेले गोंडस बाळ मनाला भुरळ पाडत होते.

अशा अनेक उत्तम प्रकारच्या साबणांच्या क्रमात आमची घरगुती बनविलेली शुद्ध व निर्भेळ सुवासिक साबणवडी जाऊन बसणार होती. या आनंदातच मी सकाळी उठले. कधी एकदा चार वाजता मंडळात जाते व हे अनमोल ज्ञान पदरात पाडून घेते असे मला होऊन गेले होते.

मंडळात जाऊन पाहते तर काय, मंडळाच्या सभासदांच्या संख्येपेक्षाही उपस्थित स्त्रियांची संख्या खूप मोठी होती आणि मंडळाची जागा अपुरी पडू लागली होती. उशिरा आलेल्या काही स्त्रिया मुलांचा लवाजमा संभाळीत खिडकीतूनच पाहत होत्या. महिलांच्या

जोरजोरात गप्पा, विनोद, मुलांची रडणी, दंगामस्ती यामुळे मंडळात मोठा कल्लोळ माजला होता. मी जोरजोरात ओरडून शांत राहण्याची विनंती करीत होते. पण माझे शब्द हवेतच विरून जात होते.

सर्वांचा गोंगाट कमी होण्यासाठी मी ग्रामलक्ष्मीला प्रयोग सुरू करण्याची सूचना दिली. तिने प्रयोगासाठी आणलेले खोबऱ्याचे तेल व इतर सामान टेबलावर ठेवले. पातळाची किनार सारखी केली. घड्याळात पाहिले व घसा साफ करून तिने माहिती देण्यास सुरुवात केली. एवढ्यात पुढच्याच रांगेतील सुलभा लुडबुड्यांच्या बाळ्याने जवळ बसलेल्या दुसऱ्या मुलाची खोडी काढली. आणि त्या दोघांच्या भांडणात खोबऱ्याच्या तेलाची बाटली लवंडली. या सर्व प्रकाराने माझा राग अनावर झाला. मी त्या बाईंना रागानेच म्हणाले, 'अहो, तुमच्या बाळ्याकडे लक्ष द्या ना.' त्याही लगेच फणकारत म्हणाल्या, 'मुलांची जात... दंगा करायचीच! त्यांना मनसोक्त बागडू दिल्याने त्यांचा विकास चांगला होतो.' हा शाब्दिक डोस तिने मला पाजला व बाळ्याच्या पाठीत धपाटा घातला.

मी मोलकरणीला पाठवून तेल आणवून घेतले. बाईंनी प्रमाण सांगून प्रयोगाला सुरुवात केली. सेंट, मृदकांती द्रव्य, खोबऱ्याचे तेल, सोडा, इ. वस्तू घालून तिने साबणवडी बनवून सर्वांना दाखविली. बघू, बघू, म्हणून प्रत्येकीने एकमेकीच्या हातून वडी घेऊन ती गोंजारत तिचा वास घेतला. काहीतरी महत्त्वाचे शिक्षण पदरात पाडून घेतल्याचा आनंद प्रत्येकीच्या चेहऱ्यावर दिसत होता. एकमेकीत जोरजोरात चर्चा चालू होती.' नाहीतरी हल्ली साबणाचे भाव फारच भडकले आहेत. घरी केलेला शुद्ध साबण तर मिळेलच आणि काटकसरही साधेल!' त्या ग्रामलक्ष्मीने प्रत्येकीला घरी साबण तयार करण्यासाठी मृदकांती सुगंधित रंगद्रव्याची पाकिटे व साचे दिले. दुसऱ्या दिवशी मंडळाच्या सभासद शोभाताईंना साबण बनविण्याची स्फूर्ती आली. साबण तयार करण्यासाठी झालेला खर्च पतिराजांपासून लपवून ठेवून आनंदाने त्यांना वडी दाखविली. पतिराजही खूश झाले. गल्लीतल्या मैत्रिणींनाही त्यांनी ती दाखविली.

तिसऱ्या दिवशी पारोसे काम आटपून शोभाताईंनी आपल्या बंड्याला नवीन साबणाने न्हाऊ घातले. पंचाने त्याचे अंग पुसू लागल्या तोच त्या बाळाचे काळेभोर जावळ त्यांना पंचावर उगवलेले दिसले. बंड्याला पंचातच गुंडाळून घेऊन त्या माझ्याकडे आल्या व रागारागाने ग्रामलक्ष्मीला शिव्या देऊ लागल्या. 'बघ म्हणावं मेलीला, माझ्या पोराच्या डोक्याचं वाटोळ केलं त्या सटवीनं!'

काय घोटाळा झाला होता ते माझ्या लक्षात आले. मृदकांती द्रव्याच्या पुड्यांऐवजी हेअर रिमूव्हरच्या पुड्या दिल्या गेल्या होत्या.

मी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण उपयोग होईना. पोराच्या गोट्यावरून हात फिरवीत फिरवीत त्यांनी मोठे भोकाड पसरले. त्यांच्या आवाजाने आसपासच्या बायकाही गोळा झाल्या. सर्वांना माहिती देता देता माझ्या तोंडाला फेस आला. तेवढ्यात आमची भांड्याची बाई येऊन टपकली. मुलाची केविलवाणी अवस्था पाहून ती म्हणाली, 'इतक्या कवळ्या पोराला कशाला वो साबण लावलात. मोठ्यांनी तरी लावून पहायचा हुता.' हे तिचे बोलणे ऐकून सर्वांना हसू आले. पण तिचे बोलणे ऐकेपर्यंत शांत असलेल्या शोभाताईंना पुन्हा रडण्याचा उमाळा आला. 'माझ्या पोराची काय हो दशा झाली!' म्हणून त्यांनी वरच्या पट्टीतला आवाज काढला. आमचे घर रस्त्यावर असल्यामुळे आमच्या घरातील आवाज ऐकून रस्त्यावरचे लोकही आमच्या घराकडे मोर्चा वळवू लागले.

माझ्या ओळखीच्या लोकांच्या मदतीने शोभाताईंना कसेबसे दवाखान्यात पाठविले. सकाळपासून कॉफीव्यतिरिक्त पोटात काहीच नव्हते. सर्वांना माहिती देऊन देऊन घशाला कोरड पडली होती. डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले होते. विश्रांती घेऊन चालणार नव्हते. मुलांच्यासाठी भातपिठले करणे जरूर होते. शाळेला उशीर झाल्यामुळे चिठ्ठ्या देऊन मुलांना शाळेत पिटाळले. दुपारी वामकुक्षी होऊन उठते तोच दारातून पोस्टमनने पत्र आत टाकले. पत्र वाचून पाहिले. ते ग्रामलक्ष्मीचेच होते. झालेल्या कार्यक्रमाबद्दल आभार मानून सुगंधी तेले शिकवण्यास कधी येऊ अशी तिने विचारणा केली होती!

**– सौ. मेधा वि. मराठे** (पृ. २३५)
पद्मश्री, विश्रामबाग,
सांगली – ४१६४१५
भ्रमणध्वनी – ९४२०६७८९६५
दूरध्वनी – (०२३३) २३०००७२२

**सुविचार**

यशस्वी व्यक्ती होण्यापेक्षा गुणवंत व्यक्ती होण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे
**– अलबर्ट आईनस्टाईन**

जे का रंगले गांजले। त्यासी म्हणे जो आपुला।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा
**– संत तुकाराम महाराज**

# Personal Financial Risk Management
# (वैयक्तिक आर्थिक संभाव्य धोक्यांचे व्यवस्थापन)

मागील अंकातील लेखात आपण संपत्ती निर्माण करण्याचा मंत्र 'थ्री एस' या संकल्पनेतून जातो याबाबतची माहिती वाचली असेल. त्यातीलच दुसरा 'S' म्हणजेच Save Regularly. या संकल्पनेत, ठरवलेली गुंतवणुक सातत्याने करणे अत्यंत गरजेचे असते. पण ही गोष्ट करणे भल्या भल्यांना सुद्धा शक्य होत नाही किंवा ते ती करू शकत नाहीत, त्याचे मुख्य कारण बहुतेक वेळा आर्थिक संभाव्य धोक्याचे अव्यवस्थापन/माहिती अभावी न केलेले नियोजन किंवा संभाव्य धोक्यांकडे केलेले दुर्लक्ष हेच असते.

**आता वरील मुद्दा विस्ताराने पाहू.**

ठरवलेली गुंतवणुक सातत्याने करण्यासाठी गरज असते सततच्या उत्पन्नाची. आपल्या आर्थिक उत्पन्नात काही अनपेक्षित कारणाने विशिष्ट वा अनपेक्षित कालावधीसाठी खंड पडणे नोकरी पेशातील व्यक्तीच्या बाबतीत नसले तरी स्वयंरोजगारीत, व्यावसायिक किंवा Business करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत सहज शक्य असते. परंतु योग्य ते नियोजन केल्यास, आपलं उत्पन्न संपूर्णपणे वा काही प्रमाणात चालू ठेवणे शक्य असते. कोणतीही गुंतवणुक करताना प्रत्येकाने या महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करायची गरज असते. आपले नियमित उत्पन्न बंद/खंडित होऊ शकण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे.

१. Natural Death (नैसर्गिक मृत्यू)
२. Accidental Death and Disability (अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व)
३. Medical Illness (वैद्यकीय आजार)
४. Critical Illness (गंभीर आजार)

शिस्तबद्ध नियोजनाने अशा प्रकारच्या संकटावर मात करता येणे सहज शक्य आहे. कसे ते पहा!

१. Natural Death (नैसर्गिक मृत्यू)

घरातील कमावत्या माणसाची Income Protection(Term) Policy असणे गरजेचे असते. नावाप्रमाणेच ही TERM म्हणजेच विशिष्ट कालावधी साठीची, कमीत कमी हप्त्यात जास्तीत जास्त रकमेची निव्वळ विमा कवच देणारी अशी योजना असते. त्यामुळेच अशा प्रकारच्या विम्याला परिपक्वता मूल्य नसते. हप्ता विम्याच्या रकमेच्या तुलनेत अत्यल्प किंवा नगण्यच असतो आणि कवच केवळ नैसर्गिक मृत्युसाठीच असते. **विम्याची रक्कम, ज्याचा विमा करायचा असेल त्याच्या वार्षिक उत्त्पनाच्या किमान १५ ते २० पट असावी, जेणेकरून दावा रकमेच्यावर कमीतकमी ८% व्याज दराने देखील मृत व्यक्तीच्या उत्पन्नाइतके व्याज प्राप्त होईल.**

२. Accidental Death and Disability (अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व)

अपघाती मृत्यू ओढवल्यास वैयक्तिक अपघात विमा योजनेतून विमा रकमेएवढे पैसे मिळू शकतात. कायमचे किंवा तात्पुरते आणि संपूर्ण वा आंशिक अशी अपंगत्वाची वर्गवारी केली जाते.

अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपघाती 'पूर्ण कायमचे अपंगत्व' आल्यास वारसास १००% विमा रक्कम दाव्यादाखल दिली जाते. 'तात्पुरते पूर्ण अपंगत्व' आल्यास १००% विमा रकमेचा परतावा दर आठवड्यास याप्रमाणे १०४ आठवड्यांत केला जातो. अर्थात मृत्यूसह अपंगत्वाच्या विम्याचा हप्ता अधिक असतो आणि तो वयावर नव्हे तर व्यावसायिक धोक्यावर ठरतो. (केवळ मृत्यूसाठी दर लाखास रु. ४५ ते रु. १०२ आणि मृत्यू व अपंगत्वासाठी रु. १७० ते रु. ३३७).

३. Medical Illness (वैद्यकीय आजार)

आजारी पडून हॉस्पिटलमध्ये भरती झाल्यास Mediclaim योजनेतून आपल्याला योजनेच्या अटींप्रमाणे पूर्ण पैसे परत मिळू शकतात. तसेच Hospital/Daily cash benefit (HCB) ह्या योजनेतुनही आपल्याला दरदिवशी ठराविक रक्कम याप्रमाणे विशिष्ट पैसे मिळू शकतात. काही योजनांमध्ये हे अंतर्भूत असते व नसल्यास ते वेगळे घेणे हे कधीही फायदेशीर ठरते. कुटुंबात कोणी व्यक्ती किंवा लहान मूल आजारी पडल्यास आजारी माणसाबरोबर घरातील इतर कमावत्या व्यक्तीसुद्धा attendant म्हणून काम करत असतात. त्या व्यक्तीचे सुट्टीमुळे झालेले नुकसान हे HCBच्या दाव्यातून काही प्रमाणात भरून निघू शकते

४. Critical Illness (गंभीर आजार)

आज कालच्या दिवसात गंभीर आजार होण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा लक्षणीयरीत्या वाढले आहे. त्याची कारणे अनेक आणि व्यक्तीगणिक बदलणारी आहेत, पूर्वी गंभीर आजार होणाऱ्या लोकांचे वय सर्वसाधारणपणे किमान ५० किंवा त्याहून जास्तच असे. परंतु आता आपल्याला २५ ते ३० वर्षे वयाच्या माणसाला सुद्धा First Heart attack, Valve Replacement, Stroke, Paralysis, Kidney Failure आणि यांसारखे इतर अनेक गंभीर आजार

| Plan Type | Sum ssured | Yearly Premium (Rs) | Company |
|---|---|---|---|
| Income Protection | ४५ लाख (केवळ स्वतः) | ११७८१ | LIC Of India |
| Mediclaim with HCB | एका वर्षात : ३ व्यक्तींसाठी प्रत्येकी ५ लाख शिवाय कोणाही एका व्यक्तीसाठी आणखी १५ लाख | १८८९७ | Max Bupa |
| | १० लाख Floater | १२८२९ | Max Bupa |
| Accidental Death and Disability | १० लाख (केवळ स्वतः) | १०१२ | National Insurance |
| Temporary Total Disablement | ५ लाख (केवळ स्वतः) | ८४३ | National Insurance |
| Critical Illness | १० लाख (केवळ स्वतः) | २५०४ | Max Bupa |
| | १० लाख पूर्ण कुटुंबाचा | ४३८३ | Max Bupa |

झाल्याचे ऐकिवात येते. या वा अशा गंभीर आजारांसाठी Critical Illness Cover अशी वेगळी योजना आहे. या योजनेत आपण प्रत्येकाचे वेगळे किंवा सर्व कुटुंबाचे मिळून एकत्र असे cover घेऊ शकता. या योजनेत वर नमूद केलेले आणि इतर अनेक गंभीर आजार अंतर्भूत केलेले असतात. **योजनेच्या यादीत नमूद केलेल्या सर्व आजारापैकी कुठलाही एक आजार झाल्यास policyची पूर्ण रक्कम दाव्यादाखल दिली जाते व योजना तिथेच बंद होते. माणसाने आपले आर्थिक उत्पन परत चालू करेपर्यंतच्या काळासाठी केलेली ही एकवेळची मदत असते.**

वरील सर्व योजनाचे फायदे व त्याची किंमत यासाठी आपण एक उदाहरण घेऊ.

विवाहित पुरुष : वय ३० वर्ष, वार्षिक उत्पन्न : रु ३ लाख,

कुटुंबात व्यक्ती : २ प्रौढ (३०,२६) १ मूल (१)

वरील तक्त्यावरून असे दिसते की आपल्या येणाऱ्या काळातील आर्थिक संभाव्य धोक्यांचे व्यवस्थापन रुपये ३०००० ते ३५००० म्हणजेच उत्पनाच्या १०% रकमेत आपण आपले व आपल्या कुटुंबाचे संपूर्ण संरक्षण करू शकतो व ज्यायोगे करत असलेली गुंतवणुक आपला कालावधी पूर्ण करू शकते. शेतातील पीक राखण्यासाठी जसे कुंपण घालावेच लागते, तसेच वर वर पाहता हा सर्व खर्च भासत असला तरीही अत्यावश्यक अशाच स्वरुपाचा आहे.

**– जयंत रघुनाथ मराठे,**
मुंबई, पृ.२४७
भ्रमणध्वनी : ९९६९१९८९७९

# आदरांजली

मार्च २०१५ च्या हितगुजमधे सौ. प्रज्ञा मराठे यांनी, कै. दिनकर मराठे (भाऊ) यांच्याबद्दल व्यक्त केलेल्या भावना खूपच हृदयस्पर्शी आहेत. मी स्वतः १९८३-८५ या कालावधीत ती. भाऊ आणि त्यांचे कुटुंबीय यांचे शेजारपण अनुभवले आहे. त्यांच्या शेजारी साठेकाकूंकडे मी पेईंग गेस्ट म्हणून राहत असे. त्यावेळी सौ. वहिनींचे प्रेम आणि ती. भाऊंची शिस्त याचा अनुभव घेता आला. तसे भाऊ कधी रागावून बोलल्याचे मला तरी आठवत नाही, पण ते घरी आहेत की नाही हे मजल्यावरील वातुवरण बघून समजत असे. शेजारच्या लोकांशी व मुलांशी कसे वागायचे (किंवा कसे वागायचे नाही) याविषयीचे सध्याचे नियम तेव्हा किमान गिरगावकराना तरी माहित नसावेत. त्यामुळे शेजारी राहणाऱ्या सर्व मुलांची काळजी घेण्याचा आणि प्रसंगी कानउघडणी करण्याचा चाळसिद्ध अधिकार ती. भाऊ, सौ वहिनी व अर्थातच साठेकाकुना आपसूक प्राप्त झाला होता. आपल्या मुलाकडे बारीक लक्ष ठेवणारे कोणीतरी आहे, हे माहित असल्याने गावाला आई पण थोडी निर्धास्त असायची. ती. भाऊ, वहिनींना माझी आदरांजली.

**– शरद मराठे,** (पृ. क्र. २१), गोरेगाव पूर्व, मोबा.९८२३६२७५७६

- प्रतिष्ठानचे एक माजी कार्यकारिणी सदस्य श्री. सदानंद विष्णू मराठे यांची सुकन्या सौ. अनुजा कान्हेरे (पृ.क्र.४१४) हिने लिहिलेले लेख पुढील साईटवर वाचावेत. ती साईट अशी – http://www.buzzle.com/authors.asp?author=85438
- **चुकीची दुरूस्ती** : ऐश्वर्या नागेश मराठे हिला दहावीत सर्वांत जास्त मार्क्स मिळाले म्हणून श्री. प्रमोद मराठे ह्यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ ठेवलेले पारितोषिक ऐश्वर्या नागेश मराठे हिला पुण्याच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात दिले होते. मागील मार्च महिन्याच्या अंकाच्या वृत्तात ऐश्वर्या **प्रमोद** मराठे चुकीचे छापले गेले. क्षमस्व!

# मारुतीला शेंदूर प्रिय का?

आतापर्यंत आपल्याला गणपती या दैवताला शेंदूर प्रिय आहे हे माहीत आहे. पण आपण पाहतो की, मारुतीलाही शनिवारी शेंदूर लावतात. असा शेंदूर नेहमी लावल्यामुळे मारुती शेंदुराचा बनला. त्याचे असे झाले, राम व रावण युद्धात ही कथा घडली. राम व महिरावण युद्ध झाले. त्यामध्ये महिरावण मरूनसुद्धा पुन्हा जिवंत व्हायचा. याच्यात राम हरणार हे मारुतीने पाहिले. महिरावणाचा मृत्यू कशात आहे याचे कारण जर मला समजले तर मी रामाला मदत करीन या विचारात मारुती गढून गेला. तेव्हा अचानक त्याची नारदमुनींशी भेट झाली. मारुतीने नारदमुनींना राम व महिरावणाच्या युद्धाचा वृत्तान्त सांगितला. नारदांनी मारुतीला एक उपाय सांगितला.

चंद्रसेना नावाची महिरावणाची एक पत्नी आहे. तिचे चित्त रामापाशी आहे. ती तुला महिरावणाचा मृत्यू कशात आहे हे सांगेल. लगेच मारुती गुप्तपणे चंद्रसेनेच्या महालात गेला. मारुतीला पाहताच चंद्रसेनेला आनंद झाला. माझ्या महालात येण्याचा मार्ग सोपा नाही तरी तू रामाचा सेवक म्हणून आलास. इथे येण्याचा तुझा हेतू काय आहे? मनात वाटत होते बरं झालं आला, आता मला रामदर्शन होईल. माझी मनःकामना पूर्ण होईल. तू रामाला मला वश करून दिलेस तर मी महिरावणाचा मृत्यू कशात आहे हे सांगेन. मारुतीने चंद्रसेनेला वचन दिले की, मी तुझ्या मंचकावर रामाला आणून बसवीन; नंतरची जबाबदारी तुझी. जर रामाचा अपमान झाला तर तो निघून जाईल. तू काळजी घे. तिने हनुमानाला महिरावणाचा मृत्यू कशात आहे हे पुढीलप्रमाणे सांगितले,

'महिरावणाला महाकालीचे वरदान आहे. त्याला कशानेच मृत्यू येणार नाही. पाच भ्रमर त्याच्यावर अमृत शिंपीत राहतील. त्याला ते भ्रमर दिसतील, पण दुसऱ्या कोणालाच ते दिसणार नाहीत. पाहा काय करायचे ते.'

हे ऐकून मारुतिराया श्रीगजाननाला शरण गेले. महिरावणाच्या भ्रमरांबद्दल माहिती सांगितली. त्या भ्रमरांना कसे पकडायचे हे जाणून घेतले. श्रीगजानन तथास्तु म्हणून अंतर्धान पावले. मारुतीमुळे रामाचा विजय झाला.

मारुतीने वचन दिल्याप्रमाणे रामाला चंद्रसेनेकडे जावे लागले. राम एकवचनी व एकपत्नी होता. त्याने मारुतीला यातून आपली सुटका करण्यास सांगितले. मारुतीने त्या पाच भ्रमरांपैकी एकाला फितूर करून घेतले. ज्या मंचकावर राम बसेल त्या मंचकाचे चारी पाय कोरून ठेवण्यास सांगितले. भ्रमराने मंचकाचे पाय कोरून ठेवले. राम आले, मंचकावर बसले, ताबडतोब मंचक मोडला, राम रागावून निघून गेले. चंद्रसेना दुःखी झाली. नवराही गेला, रामही गेला.

जाता जाता रामाने चंद्रसेनेच्या दोन मुलांना अर्धे/अर्धे राज्य वाटून दिले. पण त्याची मुलगी शुद्धा व मुलगा खड्गा कुशद्वीप वनात गेले. तेथे शुक्राचार्य गुरूंनी दोघांना कालिमातेचे तप करायला सांगितले. तपोबलाने दोघांनाही कालिमाता प्रसन्न झाली. वर मागा म्हणाली. शुद्धाने मारुती माझा 'वर' व्हावा असा वर मागितला. कालिमाता म्हणाली, दुष्टांचा संहार करण्यासाठी रुद्राने मारुतीचा अवतार घेतला आहे. तो ब्रह्मचारी आहे. मला हा वर तुला देता येणार नाही. दुसरा वर माग. पण शुद्धाने हट्ट केला की, मला हाच वर पाहिजे. महाकालीचा नाइलाज झाला. वर मिळाला.

इकडे खड्गाने देव, दानव, मानव यांजकडून आणि शुद्धाचे मारुतीशी लग्न केल्याशिवाय कोठेही मृत्यू येऊ नये हा वर मागितला. कालिमातेने तथास्तु म्हटले. पुढे शुद्धा व खड्गा स्वतःच्या नगरात गेले. मारुतीला कदलीपूर अरण्यात नारदमुनी दिसले. त्यांनी मारुतीला शुद्धाच्या व खड्गाच्या वराची सर्व हकिकत सांगितली आणि सांगितले, शुद्धाशी लग्न करून आनंदाने राहा.

नारदांची उक्ती ऐकून मारुती मनात दचकला. त्याने नारदांचे पाय धरले, मी ब्रह्मचारी आहे. हे लग्न होऊ नये म्हणून उपाय सांगा असे म्हणाला. नारदांनी श्रीगणेशाचा एकाक्षरी मंत्र देऊन मारुतीला ब्रह्मपुरीत पाठविले. श्रीगजाननच यातून तुला सोडवतील असे सांगितले. श्रीगजानन मारुतीला प्रसन्न झाले. मारुतीने शुद्धेची सर्व कथा सांगितली. माझे जर शुद्धेशी लग्न झाले तर माझ्या ब्रह्मचर्याचा भंग होईल. यातून मला सोडवावे. श्रीगजाननांनी मारुतीला जवळ बसविले. स्वतःच्या अंगावरील शेंदूर काढून मारुतीचे शरीर सिंदूरचर्चित केले. तुझे हे शेंदूरचर्चित अंग ब्रह्मचर्याचा भंग होऊ देणार नाही असा माझा तुला वर आहे. प्रत्येक शनिवारी अंगाला शेंदूर लाव. तुझ्या शेपटीबरोबर शुद्धाचे लग्न होईल. महाकालीचे वरदान कधीही असत्य होणार नाही; पण शेपटी निर्जीव आहे, तू तुझ्या रक्षणासाठी कमरेला

बांधली आहेस त्याला विवाहाचा दोष नाही. त्यामुळे तुझ्या ब्रह्मचर्यव्रताचा भंग होणार नाही एवढे सांगून श्रीगजानन अंतर्धान पावले. ठरल्याप्रमाणे शुद्धा व मारुती यांचा विवाह नारदमुनींनी लावला. विवाहाच्या वेळी मारुती तिच्याकडे पाठ करून उभा राहिला. शुद्धाने त्याला सन्मुख उभे राहण्यास सांगितले. मारुती म्हणाला, माझ्या पुच्छात खूप शक्ती आहे. अनेक पराक्रम त्याने गाजविले आहेत. शुद्धाने समजून घेतले. नारदांनी सावधान म्हणताच मारुती वरमालेसह वनात पळाला. शुद्धा क्रोधायमान झाली. तिने मारुतीला शाप दिला, तू कपटी आहेस. तुला स्त्रिया अमंगल मानतील. नगरात तुझे कोणीही तोंड बघणार नाही. तू वेशीवर राहशील. एवढे म्हणून तिने जठराग्नी प्रज्वलित करून स्वतःचा देह भस्म करून घेतला. शुद्धेच्या शापाने मारुती उद्विग्न झाला. श्रीगजाननाना शरण गेला. गजानन प्रसन्न झाले. मारुतीला म्हणाले, तू दर शनिवारी तुझ्या अंगाला शेंदूर लावायला विसरलास म्हणून तुला शापवाणी बाधली. आता मी तुला वर देतो की, शुद्धेच्या राज्याशिवाय अन्य राज्यांत स्त्रिया तुझे पूजन करतील; अमावास्या, पौर्णिमा, शनिवार या दिवशी तुला सिंदूर लावतील; लाल फुले व रुईची पाने, फुले वाहतील, तेल व उडीद वाहतील; लाडू, अन्नाचा नैवेद्य दाखवतील. ब्राह्मणांना दान देतील, दक्षिणा देतील. या दिवशी जो तुला शेंदूर वाहील तो मनात आनंदी होईल. तुला शापमुक्त करण्यासाठी मच्छंदर उमाकांत होईल. शुद्धेचा त्याच्याशी विवाह होईल. तू शापमुक्त होशील आणि मानवाचे मानस पूर्ण करशील. नेमाने हे चरित्र जो वाचील अथवा श्रवण करील त्याची विघ्ने दूर होऊन त्याच्या इच्छा तू पूर्ण करशील. अशा तऱ्हेने श्रीगजाननाने मारुतीला शापमुक्त केल्याने त्याला शेंदूर लावण्यास सुरुवात झाली. त्याची देवळेसुद्धा गावात आली.

(*चिंतामणी विजय या ग्रंथातून...)*


**– सौ. जयश्री विनायक मराठे**
(पृ.क्र.३०७), ७ श्रीकुटीर हौ.सो.,
अयोध्यानगरी, डोंबिवली (पूर्व)
दूरध्वनी – २४२४४०३




# श्रद्धांजली

**आमची सौ. सुमिता.**

सदा प्रसन्न व्यक्तिमत्व असलेली आमची सुमिता तिच्यामागे कायम आजारपण असूनसुद्धा आपल्या जिवाला जमेल तसे काम करून सर्वांचं यथोचित स्वागत करून छोट्याशा जागेत व बेताच्या मिळकतीत चार पिढ्यांची मनं जिंकून घेत होती. घरी आलेल्याचेच नव्हे तर वाटेत भेटलेल्या व्यक्तीचंही ती आदरपूर्वक स्वागत करीत असे.

१ जाने. १९६९ रोजी आमच्या घरावर दुःखाचा डोंगर कोसळल्यानंतर जागा व पैसा या दोन्ही गोष्टींच्या कमतरतेमुळे मला व दोन मुलांना माहेरी यावे लागले. कै.सौ.आईच्या आधारावर मी दोन मुलांना तिच्याकडे ठेवून नर्सिंग कोर्स पूर्ण केला व नोकरी सुरु झाली. या काळात माझ्या भावाचे एक वर्षाचे कॉलेजचे शिक्षण माझ्या दीरांनी म्हणजे सुमिताच्या सासऱ्यांनी केले. त्यांची व नीलावहीनींची आम्हाला सांभाळण्याची खूप इच्छा होती पण अपुऱ्या जागेमुळे ते अशक्य होतं. त्यातच आमची मिळकत बेताचीच असल्याने त्यांच्याकडे जाणंयेणं कमी झालं.

परंतु सौ. सुमिता, म्हणजे माझी सून माझ्या पुतण्याची पत्नी होऊन आल्यानंतर घरगुती कार्यक्रमांच्या निमित्ताने आम्हाला अगत्याने बोलावू लागली. तिच्या लाघवी स्वभावाची ओळख झाल्यावर, आमची भीड चेपून आमचं वारंवार जाणंयेणं सुरु झाले. अलीकडेच आमच्या घरच्या एका कार्यक्रमाला चि. प्रमोद आणि सौ. सुमिता हजर राहिले. सर्वांमध्ये मिळून मिसळून, जमेल ती मदत करून, सर्वाना अगत्याचे येण्यास सांगून ते ओगलेवाडीस परत गेले. घरी जाऊन येथील कार्यक्रमाचं वर्णन सगळ्यांना सांगितलं. तोपर्यंत तिची तब्येत ठीक होती. इतक्या लवकर ती आमच्यातून कधीही परत न येण्याच्या जागेवर जाईल अशी थोडीशीही शंका आम्हा कोणाला आली नव्हती. पण, 'जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला' या उक्तीप्रमाणे दि. ५/१/२०१५ रोजी हृदय विकाराच्या झटक्यानं तिला देवाज्ञा झाली. नियतीपुढे सर्वच जण हतबल असतात हेच खरं. तिच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच प्रभूचरणी प्रार्थना !


**– सुनंदा अरुण मराठे,** (पृ.क्र.२१)
'श्री'बंगला, आशिये, टेलीफोन एक्सचेंजसमोर, कणकवली.

# बालगंधर्व : एक स्मरण

**का**ही नावं ही जादूच्या मंत्रांसारखी असतात. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि बालगंधर्व ही अशीच मंत्रांसारखी नावं. वास्तविक ह्या तिघांच्या कर्तृत्वाची प्रत निराळी, क्षेत्रं निराळी. पण इथे प्रश्न परस्परांच्या तुलनेचा नाही. आपल्या गुणांनी असंख्यांच्या अंत:करणात घर करून असण्याचा आहे. जीवनात अशा काही गोष्टी असाव्या लागतात की जिथे तुमचा तर्क-चिकित्सा-विश्लेषण सगळं थांबवावं लागतं. ''एक पैशाला मिळणारा इतकासा मिळणारा अबीर चांगला का? किंवा पवित्र का?'' हे आपण विचारत नाही. छत्रपती शिवाजी, टिळक आणि बालगंधर्व या नावांचा नुसता उच्चार केला तर मराठी मन फुलून येतं. किंबहुना जे मन अशा तऱ्हेनं फुलून येतं त्याला मराठी मन म्हणतात. मिलान कुंदेरा नावाच्या एका चेकोस्लोव्हाकियन तत्त्ववेत्त्यानं म्हटलं आहे, "Without a past, we are all children. To be grown up is to have memory!" जीवनाची पाळंमुळं भूतकाळात खोलवर रुजलेली नसतील तर सगळं जीवनच संदर्भहीन होऊन जाईल. छत्रपती शिवाजी महाराज, बाळ गंगाधर टिळक आणि बालगंधर्व असे जीवन समृद्ध करणारे संदर्भ स्मरत राहण्याने काही बिघडत नाही. सुसंस्कृत माणूस म्हणून जगणं याचा अर्थ ही संस्मरणे जोपासणे हाच आहे. हा केवळ nostalgia किंवा स्मृतिविलास नव्हे. ज्यांना अशा रमून जाण्यासारख्या स्मृतीच लाभल्या नाहीत ते केवळ अभागी!

आमच्या पिढीने ऐन उमेदीतले बालगंधर्व दुर्दैवाने पाहिले नाहीत. प्रत्येक पिढी स्वत:च्या जन्माबरोबर येताना काही सुंदर अनुभव अनुभवत असते आणि आपल्या जन्माअगोदरच्या काही अलौकिक आनंदांना कायमची मुकलेली असते. बालगंधर्वांचा अभिनय, त्यांचं स्वर्गीय गाणं आमच्या पिढीनं ऐकलं नाही ही खंत आमच्या मनात कायमची राहील, पण काही कल्पना करता येतात. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या 'स्वयंवर' या भरजरी नाटकाचा खेळ आहे. दोन घंटा झालेल्या आहेत; फूट लाइटचा प्रकाश मखमली पडद्यावर झेपावला आहे : पात्रांच्या पायांच्या अधीर हालचाली पडदा आणि रंगमंच ह्याच्या फटीतून दिसताहेत. कांबळ्यांनी ऑर्गनवर सूर धरला आहे! थिरखवाँसाहेबांनी तबल्याची मनधरणी केलेली आहे आणि उदा-धूपाच्या सुगंधात नांदीचा सूर वेध घेत येतो. हे वातावरण ज्यांनी प्रत्यक्ष अनुभवलं तेचि पुरुष दैवाचे!

बालगंधर्वांबद्दल इतर थोर लोकांनी जे लिहून ठेवलंय ते वाचताना बालगंधर्व ही काय ''चीज'' होती याची कल्पना येते.

* ज्येष्ठ नटवर्य चिंतामणराव कोल्हटकरांनी म्हटलं आहे : ''आमच्या दीनानाथाचं गाणं ऐकताना ऑडियन्स वीज कडाडल्यावर थक्क होऊन बसावं तसा बसे आणि नारायणराव बालगंधर्वांचं गाणं मोगऱ्याचा वास घेत घेत माणसानं ऐकावं तसा ऐके!''
* वि. वा. शिरवाडकरांनी म्हटलं आहे : ''नारायणराव बालगंधर्व म्हणजे मराठी रंगभूमीवरील एक अपूर्व घटना! फूटलाइटच्या प्रकाशात उगवलेलं इंद्रधनुष्य. सुगंध असलेला स्वर आणि स्वर असलेलं चांदणं!''
* पंडित भीमसेन जोशी ह्यांनी म्हटलं आहे : ''नारायणराव बालगंधर्वांनी 'अवघाचि संसार सुखाचा करीन' या अभंगाची आळवणी सुरू केल्यावर - आमच्या तंबोऱ्याच्या भोपळ्याची भाजी केली असती तर सत्कारणी लागली असती!''
* आचार्य अत्र्यांनी म्हटलं आहे : ''मराठी जनता स्वभावत:च नाटकाची वेडी आहे. कारण महाराष्ट्रीयांच्या स्वभावात जन्मत:च मुळी नाट्य भरलेलं आहे. जो समाज परिस्थितीला शरण जातो त्याच्या आयुष्यात नाट्य असू शकत नाही. महाराष्ट्र हा काही उगीच कोणाच्या मेहेरबानीने 'महा' झालेला नाही. या महाराष्ट्राच्या भूमीत ज्ञानेश्वरांसारखे महान संत आणि शिवप्रभूंसारखे अलौकिक वीर जन्माला आले त्याचप्रमाणे बालगंधर्वांसारखे स्वरूपसुंदर गायक कलावंतसुद्धा जन्माला आले. म्हणून महाराष्ट्र हा जसा संतांचा आणि वीरांचा देश आहे त्याचप्रमाणे तो गंधर्वांचाही देश आहे.''
* पु. ल. देशपांडे ह्यांनी म्हटलं आहे : ''ह्या नराला नारायण हे पाळण्यातलं नाव ठेवणारी माता पितरे आणि त्याचा स्वर कानी आल्यावर त्याला ''हा बालगंधर्व आहे'' म्हणणारे बाळ गंगाधर टिळक ह्या साऱ्यांच्या कानात त्या त्या क्षणी विश्वातल्या शुभंकर देवताच कुजबुजून गेल्या असतील. पदवी देणाराही थोर आणि घेणाराही.''

※ ग. दि. माडगूळकरांनी म्हटलं आहे–

*रतीचे जया रूप लावण्य लाभे*
*कुलस्त्री जसे हास्य ओठात शोभे*
*सुधेसारखा साद स्वर्गीय गाणे*
*असा बालगंधर्व आता न होणे*

बालगंधर्वांच्या ध्वनिमुद्रिका किंवा जुनी ध्वनिमुद्रणं ऐकल्यावर सतत जाणवतं की त्यांचा जो स्वर होता तो जन्मजात भिजलेला स्वर होता. त्यांनी ''नाथ हा माझा मोही खला'' म्हटलं की प्रत्येक माणसाला वाटतं की हा जो कोण हिचा नाथ असेल त्याचा हेवा करावा असला हा नाथ असला पाहिजे. त्यांनी म्हटलेल्या ''नाही मी बोलत नाथा'' ह्या स्वरांना श्रृंगारस्वरूप येतं. ''रामाच्या ग बागेमध्ये'' सारखी जात्यावरची ओवी गाताना त्या स्वरांमध्ये वात्सल्य दाटून येतं. बालगंधर्वांच्या स्वरांची मूर्ती मुळातच सोज्ज्वळ आहे. ''धनी मी पती वरीन कशी अधना'' म्हणणारी – धनयौवनाने चढेल वाटणारी 'भामिनी' असो – ''साम्य तिळहि नच दिसत मुखाचे' म्हणत लाडिक थट्टा करणारी 'रेवती' असो – 'मम मनी कृष्णसखा रमला' म्हणून कृष्णध्यानी विरलेली 'रुक्मिणी' असो – नाहीतर चारुदत्ताला पाहण्यासाठी आतुर झालेली 'वसंतसेना' असो – बालगंधर्वांच्या स्वरांच्या मूर्तीनं आपलं सोज्ज्वळपण कधी सोडलं नाही. चिडलेल्या–रुसलेल्या–रागावलेल्या सुंदरीचे सारे विभ्रम शेवटी सौंदर्यच वाढवतात तसं बालगंधर्वांच्या स्वरांचं आणि बोलण्याचं आहे. शेवटी 'सुखविलासि सोडी न विनया' अशा या बालगंधर्वांचं वर्णन करताना वल्लभाचार्यांचा एक श्लोक आठवतो :

रूपम् मधुरम्, गीतं मधुरम्
वचनम् मधुरम्, वसनम् मधुरम्
नयनम् मधुरम्, हसितम् मधुरम्
चलितम् मधुरम्, वलितम् मधुरम्
मधुराधिपते अखिलम् मधुरम्

वि. वा. शिरवाडकरांनी एक आठवण सांगितली आहे : नाशिकला आमच्या लोकहितवादी मंडळाच्या नाटकाची तालीम चालू होती. तेव्हा अचानक बालगंधर्व आले. सात तालांचे आभाळ पादाक्रांत करणाऱ्या गरुडासमोर घरट्यातून कालच बाहेर पडलेल्या चिमण्यांच्या पिल्लांनी आपलं उड्डाणकौशल्य दाखवावं तशी ती आमची तालीम होती. त्यानंतर काही वर्षांनी नाशिककरांनी बालगंधर्वांचा सत्कार आयोजित केला. त्या समारंभात बालगंधर्व बोलले : ''आज मी कोणाला काही देऊ शकत नाही. माझं नाटक, माझं गाणं माझ्यापासून दूर गेलं आहे. तुम्ही माझ्यावर अपार प्रेम केलंत. त्यातून उतराई होण्याचा मार्ग आता बंद झाला आहे, पण तरीही तुमचं प्रेम मला हवं आहे. ईश्वराची कृपा जगण्यासाठीच नाही, तर मरण्यासाठीही लागते. देवाघरी मी काय अपराध केलाय कोणाला ठाऊक. पण ती कृपा मला लाभली नाही. केशवराव भोसले फार भाग्यवान. ते हयात होते तेव्हा आमच्यात स्पर्धा होती, पण हेवा नव्हता. पण आता मला त्यांचा हेवा वाटतो. लोकांना फार हवे होते तेव्हाच ते वारले. हजारो लोक आसवं गाळीत त्यांच्या अंत्ययात्रेला आले होते. त्यांच्या शवाला खांदा द्यायला मोठमोठे नेते पुढे येत होते – ते मरण्याचं वैभव होतं – जगण्याची कृतार्थता होती. उद्या आमच्या अंत्ययात्रेला चार–सहा माणसं तरी जमतील की नाही शंका आहे!'' सिंधू तरी इतकं करुण बोलली की नाही शंका आहे. अशा बालगंधर्वांना निधनोत्तर श्रद्धांजली वाहताना कविवर्य मंगेश पाडगांवकरांनी म्हटलं आहे :

*एका राजहंसासाठी होते आभाळ स्वरांचे*
*त्याचे पंख दिशा झाले गात गीत अनंताचे*
*काळोखात आकाशाने जेव्हा मागितले दान*
*त्याने सूर लावताच उभा तेजोनारायण*
*नि:शब्दाची फुले झाली त्याचे स्पर्शताच गीत*
*सूर नचिकेत झाले केली मृत्यूवर मात*
*डोळे मिटून प्यायचा जरी इथं दु:ख प्याला*
*तरी त्याच्या सुरांमुळे आयुष्याला अर्थ आला.*

**– श्री. सदानंद विष्णु तथा भाऊ मराठे,**
(पृ. ५०७), नीलमणी, ३२,
शिवाजी पार्क, डॉ. मधुकर राऊत रोड,
दादर, मुंबई, दूरध्वनी – २४४४८६४८

## वाचकांचा पत्रव्यवहार

**संपादिका,**

डॉ सौ. सुमेधावहिनींस,

आपण हाती घेतलेली संपादकीय जबाबदारी अत्यंत शिस्तबद्ध घरेलू माणसाला साजेल अशी आहे. धन्यवाद!

नोकरी, कामधंदा या निमित्ताने आजचा कुटुंबपरिवार दूरवर स्थिरावला आहे. घाईगर्दी, धावपळ या निमित्ताने कुणाची कुणाला दखल घ्यायला वेळ नाही. त्यामुळे वत्सल माता–पित्यांना अशा मुलामुलींबरोबर संपर्क साधायला फार प्रयास पडतात. अशा वेळी 'हितगुज' नावाचं आपलं घरचं माणूस पुढे येतं व ही भूक भागवतं. येथे प्रत्यक्ष भेटीचा आनंद भोगल्याचा आनंद मिळतो हा तर अनुभव आहे. आपण हाती घेतलेलं काम व त्याची कार्यवाही योग्य दिशेनं होत आहे असं मला वाटतं.

**– चित्रकार राजा मराठे,** (पृ. क्र. २३४)

# कष्टाळू, समाधानी श्रीमती आशा अशोक पटवर्धन तथा लीला यशवंत मराठे या माहेरवाशिणीची यशोगाथा (पृ.५२५)

''जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारे मना तूचि शोधूनी पाहे।'' असे समर्थ रामदास स्वामींनी 'मनाच्या श्लोका'द्वारे लोकांना सांगितले आहे. खरेच, जगात सर्व सुखी असलेला मनुष्य शोधूनही सापडत नाही!

हे सत्य लक्षात घेऊन, माणसाने आपल्याला कोणती सुखे मिळाली नाहीत याचा विचार करून दु:ख करण्यापेक्षा आयुष्यात जी काही सुखाच्या जमेची बाजू असेल तिचा विचार करून समाधानाने जगावे, असा उपदेश समर्थांनी केला आहे.

... परंतु प्रत्यक्षात प्रत्येक मनुष्य कळत-नकळत, मिळत असलेल्या सुखाकडे दुर्लक्ष करून, जे सुख मिळाले नाही त्याच्याबद्दलच दु:ख करीत असताना आढळतो. बहुतेक जण सदैव आपल्या अप्राप्य सुखाच्या दु:खात बुडालेलेच दिसतात.

... परंतु यालाही काही मंडळी अपवाद असतात. अशाच व्यक्तींपैकी आपल्या मराठ्यांची माहेरवाशीण लीलाताई या आहेत.

श्रीमती लीलाताई यांचा विवाह श्री. अशोक पटवर्धन यांच्याबरोबर अगदी लवकर म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी झाला. काही अपरिहार्य कारणामुळे एक वर्षातच त्यांना बेळगावला म्हणजे माहेरी आणले. दरम्यान, त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव अमित ठेवले. अमित साधारण एक वर्षाचा असतानाच त्याचे वडील म्हणजे लीलाताईंचे पती वारले. आयुष्यातील सर्वांत कठीण प्रसंग लीलाताईंवर ओढवला. पण या दु:खाने खचून न जाता, लीलाताईंनी खंबीरपणे निर्णय घेतला तो स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा. मुलाला शिकवून मोठे करण्याचा. लीलाताईंचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत, म्हणून त्यांनी लोकांच्या घरी जाऊन स्वयंपाक करण्याची कामे स्वीकारली. त्यांत कोणताही कमीपणा मानला नाही. कष्टांना आपलेसे केले. कंटाळा-आळस वगैरे दुर्गुणांना आयुष्यात थाराच दिला नाही. मोठ्या हिमतीने ताठ मानेने कष्ट करून अर्थार्जन केले. कोणापुढे पदर पसरला नाही. दया मागितली नाही. कणखरपणे, मोठ्या हिमतीने, धैर्याने वैधव्यावर मात केली. रडत-कुढत न बसता जीवनात सुखाचे दिवस आणले.

मोठ्या प्रमाणावर स्वयंपाकाची कामे करण्याचा काही अनुभव नसताना लीलाताईंनी स्वयंपाकाबद्दल शिकून घेतले. अगदी लोकांच्या घरी जाऊन भाजी चिरण्यापासून शिकायला सुरुवात केली. पुष्कळ मान-अपमान, उपेक्षा-अवहेलना सहन केली. लीलाताईंच्या बाबतीत सांगायचे तर त्यांच्या कामाला 'सीझन' नाही. वर्षातले ३६५ दिवस कामाचे असतात. श्रीमंतापासून गरिबापर्यंत कुणालाही त्या नाही म्हणणार नाहीत. अडचणीला न बोलावता जाऊन मदत करण्याचा परोपकारी स्वभाव लीलाताईंचा आहे. त्यांना विचारून लोक कार्यक्रमाचा दिनांक ठरवतात. ह्यातच त्यांचे यश लपलेले आहे.

हसतमुख, वक्तशीरपणा, स्वच्छता, पदार्थाचा योग्य वापर, अन्नाची नासाडी नाही. दोनदा करायला लागले तरी हरकत नाही, तक्रार नाही. योग्य सल्ला देणार. हे सर्व गुण लीलाताईंच्या व्यक्तिमत्त्वात समाविष्ट आहेत म्हणूनच त्या या उद्योगात यशस्वी ठरल्या आहेत.

**केवळ स्वयंपाकी म्हणून नाही तर...**

स्वयंपाकाला गेल्यानंतर स्वयंपाकी म्हणून नाही तर मी ह्या घरची सदस्य आहे, ही भावना मनात ठेवून काम करणार, ह्या त्यांच्यापाशी असलेल्या दुर्मिळ गुणांमुळेच त्या लोकप्रिय झाल्या. केवळ बेळगावातच नव्हे तर पुणे, बंगलोर, गोवा, डोंबिवली इ. शहरातही त्या त्यांच्यात असलेल्या या अंगभूत गुणवत्तेमुळे, मान्यता पावून प्रसिद्ध झाल्या.

**गोड दिवस**

चांगल्या कामाची पावती समाजात मिळते. सलग चाळीस वर्षे कर्तव्य करीत असलेल्या लीलाताईंचा रोटरी क्लब - लायन्स क्लबद्वारा सत्कार करण्यात आला. समाजाने लीलाताईंनी केलेल्या कामाची नोंद घेतली. सत्काराला उत्तर देताना लीलाताई म्हणाल्या, ''माझ्या हातचं अन्न लोकांना गोड लागलं, म्हणून माझ्या आयुष्यात हे गोड दिवस आले.''

कष्टाचं मधुर फळ लीलाताईंना मिळालं. लीलाताईंचा संसार सुखाचा आहे. सून शिरसीची आहे. मुलगा उत्तम शिकलेला आहे. शिवाय पौरोहित्य करतो. एक नात आणि नातू आहे. त्यांचा स्वत:चा छोटासा फ्लॅट आहे.

स्वत:च्या वैयक्तिक दु:खाचा बाऊ न करता, प्रतिकूल परिस्थिती असतानाही, अपार कष्ट सोसून मुलाला त्याची झळ पोचू न देता त्याचे 'पितृत्व'ही त्यांनी समर्थपणे सांभाळले.

**अन्नपूर्णा**

अशा या श्रीमती आशा अशोक पटवर्धन, मराठ्यांच्या माहेरवाशीण लीला यशवंत मराठे या अन्नपूर्णेची ही यशोगाथा पाहून मराठे परिवाराला लीलाताईंचा अभिमान वाटतो.

**- श्री. विठ्ठल मराठे,** बेळगाव, (पृ. ५२५), (लीलाताईंचा भाऊ)
शब्दांकन - डॉ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)

# अमेरिकन न्यूज रिपोर्टर क्रिस्टीन चुबुक

**गे**ल्या काही वर्षांपासून आपण दररोज देश-परदेशातील आतंकवाद्यांच्या हिंसक कारवाया ऐकतोय व टेलिव्हिजनवर बघतोय विशेष म्हणजे इस्लामिक स्टेट ISISच्या इराकमध्ये निर्दोष लोकांची सामुहिक हत्या, शिरच्छेद व त्याचे जाहीर व्हिडिओचे प्रदर्शन. खास करून वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना लक्ष करून त्यांचे शिरच्छेद करून जगातील सर्व मीडियाला धाक बसविण्याकरताही कत्तल व त्याचे व्हिडिओ प्रक्षेपण बघायला मिळते. आतंकवाद्यांच्या विरुद्ध प्रचार होऊ नये म्हणून हे सारे निम्न कोटीचे प्रयत्न आणि तेही धर्माच्या नावावर!

परंतु जगात काही मृत्यूच्या घटना खूप आश्चर्यचकित करणाऱ्याही घडत असतात. अशीच एक घटना ४० वर्षांपूर्वी अमेरिकेत घडली होती. ती एक अमेरिकन वार्ताहर-कम-न्यूज रिपोर्टर मिस् क्रिस्टीन चुबुकची आहे. ही वार्ताहर स्वत:च्या कामात खूप चोख, प्रामाणिक व गंभीर होती. परंतु तिच्या खाजगी जीवनात काही समस्यांमुळे ती नेहमी मानसिक ताण अनुभवीत असे. अशा वेळीच प्रथमच एक लाइव्ह टॉक शो करण्याची संधी तिला मिळाली.

अमेरिकेतील 'ओहिया' शहरात दि. २४ ऑगस्ट १९४४ साली जन्मलेली क्रिस्टीन चुबुक अत्यंत स्वरूपवान युवती होती. तिचा ३० वा वाढदिवस होता. पण ती अद्याप अविवाहित होती. दोन युवकांशी तिचे डेटिंग होऊनही तिला लग्न करण्यात अपयशच मिळाले. त्यामुळे ती मानसिक ताण अनुभवीत होती. कधीकधी ती आपल्या सहकाऱ्यांशी व जवळच्या लोकांशी ''मला आत्महत्या करावीशी वाटते'' असेही बोलून जायची. तिने एका मनोचिकित्सकाचा सल्लाही घेतला होता. ती काम करीत असलेल्या अमेरिकेतील 'चॅनल-४०'च्या न्यूज डायरेक्टरला 'आत्महत्या' विषयावर 'एपिसोड' करावयाची कल्पना दिली. त्याकरता डायरेक्टरनी तिला मंजुरीही दिली. मंजुरी मिळाल्यावर तिने एका पोलीस अधिकाऱ्याची भेट घेऊन ह्या विषयावर चर्चा केली. आत्महत्येचे विविध प्रकार, पद्धती कशा असू शकतात त्या जाणून घेतल्या. त्यानंतर तिने स्वत:करता एक रिव्हॉल्व्हर खरीदले.

एक आठवड्यानंतर तिने २५ जुलै १९७४च्या सकाळच्या प्रक्षेपणात सनकोस्ट डायजेस्ट (Suncoast Digest) नावाने लाइव्ह शो करण्याचे ठरविले. ह्यापूर्वी तिने कधी बातम्या वाचण्याचा असा कार्यक्रम केला नव्हता. त्याबद्दलही तिच्या मनावर दडपण होते. मॉर्निंग टॉक शोचे पाहुणे स्टुडिओत तिची वाट बघत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीची आठ मिनिटे तिने राष्ट्रीय बातम्या वाचल्या. त्यानंतर स्थानिक विमानतळाजवळ असलेल्या रेस्टॉरंटमध्ये शूटिंग केलेल्या रीलचे प्रक्षेपण करावयाचे होते, पण व्हील अडकली. प्रयत्न करूनही चालू न झाल्याने तिच्यावर मानसिक ताण पडला. तिने कॅमेऱ्याजवळ जाऊन जाहीर केले की, 'चॅनल ४०'ची नेहमीच खूप तेज आणि ताज्या बातम्या प्रक्षेपण करण्याची परंपरा आहे. वैशिष्ट्य आहे. आता तुम्ही बघाल एक लाईव्ह आत्महत्या.' एवढे बोलून तिने स्वत:च्या पर्समधून पिस्तूल काढून स्वत:च्याच कपाळावर ठेवून ट्रिगर दाबला आणि तिचा देह स्टुडियोत पडला. तिचा मृत्यू झाला.

ही घटना हजारो प्रेक्षकांनी आपल्या टीव्हीवर बघितली; परंतु कुणाचा विश्वास बसेना! ही सत्य घटना - क्रिस्टीन चुबुकची आत्महत्या - जगाच्या इतिहासात प्रथम आणि एकमात्र अशी आहे. अशी एक न्यूज रिपोर्टर जिने लाइव्ह शो टेलिव्हिजन व ब्रॉडकास्टिंग दरम्यान आत्महत्या केली.

**- सदाशिव बळवंत मराठे** (पृ.३८०)
'अन्नपूर्णा', शास्त्रीपोळ, मराठे वाडा,
कोठी चार रस्ता, वडोदरा (बडोदे).
पिन - ३९०००१
दूरध्वनी - ०२६५-२४२३०५५
०२६५/२४२८६१८



## हसरे हितगुज

**लग्नाच्या पुजेच्या वेळी...**

नवरा : गुरुजी, पत्नीला माझ्या डावीकडे बसवायचं की उजवीकडे?
भटजी : बघ जमेल तसं कर. नाहीतरी नंतर ती तुझ्या डोक्यावर बसणार आहे.

बायको (नवऱ्याला) : तुम्ही खूप मूर्ख आहात. तुमच्या डोक्यात भुसा भरला आहे.
नवरा : अच्छा म्हणून नेहमी तू माझे डोके खात असतेस.

# आडवाटेवरील दुर्गरत्ने

८ डिसेंबर २०१३. वडखळहून कुडकुडत आम्ही निघालो. खड्डेमय रस्ते पार करीत कोलाडच्या आसपास सूर्यदर्शन घेत इंदापूर आणि त्यापुढील तळा गाव गाठले. गावात दुचाकी ठेवली आणि तळगडकडे निघालो. वाटेतच एक प्रेमी युगुल बसले होते. त्यांना वाट विचारून त्याच्या शांततेला बाधा आणली. भग्न दरवाजातून – ज्याला हनुमान दरवाजा म्हणतात त्यातून – किल्ल्यात प्रवेश केला. जवळच शरभ शिल्प आणि दगडात कोरलेली हनुमानाची मूर्ती पाहिली. किल्ला दक्षिणोत्तर पसरलेला असून घेरा तसा लहान आहे. पाण्याची टाकी, काही पडके वाडे आणि शंकराची पिंडी पाहून आम्ही परतीचा मार्ग धरला.

तळगड उतरून आम्ही घोसाळगडाकडे उर्फ वीरगडाकडे निघालो. सूर्य डोक्यावर आला होता. पण जंगलातून जाणारी वाट होती. त्यामुळे सर्व आल्हाददायी वाटत होते. घोसाळे गावातील गणपती मंदिराच्या मागून आम्ही किल्ला सर करायला सरसावलो. सचिन जरा थकल्यासारखा भासत होता. पण लेमनच्या गोळ्याने वेळ मारून नेली. तोडक्या-मोडक्या पायऱ्यांवरून किल्ल्यात प्रवेश केला. मुख्य दरवाजाचे चिरे बऱ्यापैकी ढासळलेले आहेत. येथेही शरभशिल्प पाहिले आणि चोरदरवाजा गाठला. किल्ला डोळ्यांत साठवून घेतला आणि बालेकिल्ल्याकडे निघालो. वाटेत उजवीकडे आणि डावीकडे पाण्याची टाकी पाहिली आणि एक खांब टाके पाहून तोफेजवळ आलो. येथून पुढचा टप्पा खडतर आहे तो गवतामुळे आणि घसाऱ्यामुळे. मी पुढे आणि सचिन मागे. एका ठिकाणी सचिन थांबला आणि मी पुढे बालेकिल्ल्यात गेलो. सर्वत्र गवताचे राज्य होते. तळगड आणि मांदाड खाडीचे दर्शन घेऊन मी आणि सचिन खाली उतरायला लागलो. हाताला काही आधार मिळत नव्हता. गवत घसाऱ्यामुळे पाय रोवला जात नव्हता. छोटीशी चूकदेखील एकदम खाली घेऊन जाऊ शकली असती. सचिनचा पाय सतत सरकत होता. शेवटी जीव मुठीत घेऊन एक थरारक आणि रोमांचक अनुभव गाठीशी जोडून घेत घसरत खाली उतरलो. शिर सलामत होते. त्यामुळे गणपती मंदिराच्या मागे फलाहार केला आणि बिरवाडीकडे कूच केले. नागमोडी वाट आणि त्यातून गाडी चालली सुसाट या ओळीने मुलीच्या बडबडगीताच्या सुरुवातीच्या निवेदनाची आठवण जागी झाली.

टपरीवर लिम्का ढोसून बिरवाडीला पोचलो तेव्हा सूर्य मावळतीला झुकला होता. भवानीमातेचे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेऊन ओम्कार साधना केली आणि किल्ल्याकडे निघालो. भारीभक्कम सात बुरूज आणि तटबंदी बिलकूल नाही हे या किल्ल्याचे वैशिष्ट्य. पूर्ण रस्त्यावर पाने विखुरलेली आहेत. त्यामुळे वाट मिळणे जरा मुश्कील झाले आहे. एका ठिकाणी वाट आहे असे वाटले आणि मी वर जायचे ठरवले, पण दगड ठिसूळ झाले होते. जो पकडू तो हातात. मी पंधरा फूट तर गेलो. पण रस्ता गवसला नाही. मग खाली येऊन पानांनी बहरलेला रस्ता पायदळी तुडवत पुढे निघालो, तर भरभक्कम दोन बुरूज आणि त्यात लपलेले प्रवेशद्वार दिसले. तीनपैकी या किल्ल्याचे दार शाबूत आहे. आत गेल्यावर डावीकडे पाण्याचे टाके व दगडी भांडे पाहून बालेकिल्ला गाठला. तेथेही एक दरवाजा होता. पण दगडविटांनी त्याला कधीचीच मूठमाती दिली होती. इथेही गवत खूप वाढलेले होते. डोलकाठीपर्यंत जाऊन आम्ही परत फिरलो. पण पुन्हा तेच. सर्वत्र पाने पसरलेली होती. त्यांतून वाट शोधत भवानी मंदिराजवळ आलो आणि हायसे वाटले.

गावात पाणी भरून घेतले आणि चणेरा गावात सायकलशर्यत होती. तिला मागे टाकत रोह्याकडे कूच केले. आता वेळ होती ती गाडीच्या पोटपूजेची. तिला पेट्रोल पाजून आम्ही चायनीज गाडीवर सूप घेतले आणि डोळ्यांतून गंगा-यमुना वाहू लागल्या. सगळी सर्दी आणि थंडी बाहेर निघाली. सूर्यदेवाचा निरोप घेत निसर्गाशी जवळीक साधून आम्ही निघालो. तेव्हा एक वाक्य सुचले. तळगडावर तळ मांडून, घोसाळ्यावर मनसोक्त घसरून, बिरवाडीला सर करून दोन वीर निघाले मुंबईला.

**– श्री. निरंजन प्रभाकर मराठे,**
(पृ. १२०), इंद्रायणी दर्शन,
पहिला मजला, ए-१,
तळेगाव, दाभाडे
मोबाइल – ९८२०७३४८८४

# राजा बढे – एक राजा माणूस (जन्मशताब्दीनिमित्त लेख)

## आजन्म कविता हीच निष्ठावंत जीवन सहचरी असणारा राजयोगी कवी राजा बढे

**'चं**द्रिका ही जणू...', 'चांदणे शिंपीत जाशी', 'माझिया माहेरा जा', 'प्रेम केले काय झाला गुन्हा?', 'हसतेस अशी का मनी, कोण ग उभे तुझ्या अंगणी', 'मोहुनिया तुजसंगे नयन खेळले जुगार', 'हसले मनी चांदणे', 'सांगू कशी ग मनाची व्यथा ही...', 'कशी रे तुला भेटू मला वाटे लाज, लौकिक तुझा मोठा आणिक घरंदाज,' 'दे मला दे चंद्रिके प्रीती तुझी' यासारखी उत्कट प्रेम-भावगीते, 'कळीदार कपुरी पान कोवळे छान केशरी चुना, रंगला कात केवडा वर्खाचा विडा घ्या हो मनरमणा' ही रंगतदार लावणी लिहिणारे, 'गर्जा महाराष्ट्र माझा जय जय महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्रगीताने निनादणाऱ्या आपल्या घरांत, कानांत आणि तनामनांत कवी राजा बढे यांच्या अप्रतिम, सुमधुर कवितांनी आणि गीतांनी चिरंतनत्व प्राप्त केले आहे.

हिंदुत्वनिष्ठ राजा बढे यांची स्वातंत्र्यवीर सावरकर आणि भाषाप्रभू पु. भा. भावे ही आराध्यदैवते होती. सावरकरांच्या 'कमला' या खंडकाव्यावर त्यांनी 'योजनगंधा' हे काव्यात्मक पुस्तक लिहिले. १९५२ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुण्याला अभिनव भारताचा सांगता समारंभ केला. त्या वेळी राजा बढे यांच्या 'क्रांतिमाला' या देशभक्तिपर काव्य संग्रहाचे प्रकाशन स्वातंत्र्यवीरांच्या हस्ते झाले. प्रस्तावनेत सावरकरांनी राजा बढे यांना लिहिलेल्या पत्राचा अंतर्भाव आहे. त्यात, 'आपण स्वत: मराठी वाङ्मयात इतके सुप्रतिष्ठित, नामवंत नि प्रतिभासंपन्न कवी नि साहित्यिक आहात की आपल्या काव्यास माझ्या प्रस्तावनेची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.' असे गौरवोद्‌गार आहेत. कविवर्य ज. के. उपाध्ये आणि श्री. शं. बोबडे, बढे यांना गुरुस्थानी होते. शाहीर साबळे यांनी आपल्या लेखात म्हटले आहे की, 'आपण आपल्या आयुष्यात खूप काही चांगलं करून जातो. पण एखादीच गोष्ट आपलं संपूर्ण आयुष्य व्यापून टाकते. माझ्या बाबतीत मी आनंदाने हे श्रेय राजा बढेंच्या या गीताला देतो. 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताने मला चिरंजीवित्व प्राप्त करून दिले म्हणून मी या गीताचा व कविवर्य राजा बढे यांचा जन्माचा ऋणी आहे...'

राजा बढे अविवाहित होते, पण कुटुंबवत्सल होते. राजा बढे यांचे आपल्या बहिणी कमलाताई, विमलाताई, सिंधुताई तसेच भाऊ बकुळ व बबन ह्यांच्यावर जिवापाड प्रेम होते.

साहित्यिक, प्रतिभावंत कवी, चित्रकार, कथाकार, चित्रपटनिर्माता, अभिनेता-नट, काव्य-गायक, परीक्षक, देखणे, राजबिंडे, आकर्षक, रसिक व्यक्तिमत्त्व असलेल्या राजा बढे यांना जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन!

**– डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**

(पृ. १२०)

## मानसन्मान : अप्पा खांबेटे (पृ. ६९६)

ठाणे येथील TISSA या लघुउद्योजकांच्या संस्थेचे संस्थापक श्री. अप्पा खांबेटे हे आपल्या प्रतिष्ठानचे सभासद व हितचिंतक. डिसेंबर १४ मध्ये आलेल्या अर्धांगवाताच्या गंभीर संकटावर मात करून ते पुन्हा नव्या जोमाने आपल्या कार्यास सुरवात करीत आहेत. यानिमित परमेश्वराच्या आणि वैद्यकीय उपचार करणाऱ्या व्यक्तींच्या आभारप्रदर्शनासाठी कुटुंबीय व व्यावसायिक संबंधिताचं एक स्नेहसंमेलन त्यांनी आयोजिलं होतं. याला किनार होती ती त्यांच्या ८५व्या, पत्नी पद्मजा यांच्या ८०व्या तसेच पुत्र गिरीश व स्नुषा गीता यांच्या विवाहाच्या २५ व्या वाढदिवसाची. या समारंभानिमित्त प्रतिष्ठानला रु. १०,०००/- ची देणगी दिल्याबद्दल प्रतिष्ठान त्यांचे आभारी आहे. ईश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो हीच सदिच्छा.

**गुणवत्ता पारितोषिकांसाठी विद्यार्थ्यांनी दि. १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत प्रतिष्ठानकडे अर्ज करावेत, किंवा अर्ज संकेत स्थळावरुनही करता येतील. अधिक माहितीसाठी मार्च 'हितगुज' पृ. १७-१८ पहा.....**


**'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात**

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

**पाव पान : रु. ६००/-**
**अर्धे पान : रु. १,२००/-**
**पूर्ण पान : रु. २,५००/-**

**रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने किंवा आयडीबीआय बँक दादर बचत खाते क्र. (०५०११०४०००० ४३५१९) मध्ये जमा करून तसे कळवावे.**

# प्रतिष्ठानचे देणगीदार व सभासद सूची
## १५ सप्टेंबर २०१४ ते १५ फेब्रुवारी २०१५

**देणगीदार : वैद्यकीय मदत निधी :** एअर कमोडोर (नि) मधुकर कृष्ण, पुणे (७५००), रवींद्र दिनकर, मालाड (५०००), विठ्ठल महादेव मराठे सांगली (१०००)

**देणगीदार : हितगुज शतकमहोत्सव :**

**प्रत्येकी रु. १०००० :** रमाकांत विद्वांस माहीम, मोहन सदाशिव (खार), श्रीनिवास अनंत (दादर), मधुकर रा. चक्रदेव (डोंबिवली), सुलभा सुरेश (माहीम), वासुदेव कृष्ण (कारकल कर्नाटका)

**प्रत्येकी रु. ५००० :** सी. गो. खांबेटे अंधेरी, हेमंत अरुण (नालासोपारा), शरद अरुण (गोरेगाव), सदानंद विष्णू (वांद्रे), डॉ. सुनील यशवंत (माणगाव), सदाशिव बळवंत (बडोदे), वामन गणेश (पुणे)

**प्रत्येकी रु. ३००० :** सतीश विष्णू (पुणे), किरण सीताराम (नाशिक)

**प्रत्येकी रु. २५००:** विंग कमांडर (नि) यशवंत लक्ष्मण (पुणे), मेधा हेमंत परांजपे (विलेपार्ले)

**प्रत्येकी रु. २०००:** शशांक श्रीधर (वेंगुर्ला), सुरेश गोविंद (डोंबिवली),

**रु. १०००:** दिनकर रामचंद्र (गिरगाव)

**जाहिरातदार : हितगुज शतकमहोत्सव**

रु. १०००० मराठे परिवार (गोवा)

**प्रत्येकी रु. ५०००:** परचुरे प्रकाशन मंदिर (गिरगाव), कामत आणि कं. (फोर्ट),

**प्रत्येकी रु. ३०००:** अशोक वैद्य, मुकुंद नातू, दादा पोवळे, चंद्रकांत परांजपे, उत्तम जोशी, मनीष जैन, विनोदभाई, कमलेश श्रीश्रीमाळ (सर्वजण ठाणे)

**रु. १८०० :** प्रकाश गणेश विद्वांस (अहमदाबाद)

**प्रत्येकी रु. १२००:** चिंतामण त्र्यं. (कळवा), कुमुद सु. डोके (ठाणे), किशोर खांबेटे (अहमदाबाद), उदय दत्तात्रय (मुलुंड), प्रभाकर दामोदर (वडाळा)

**रु. १०००:** डॉ. प्रमोद पुरोहित (ठाणे)

**प्रत्येकी रु. ६००:** प्रमोद कृष्ण (ठाणे), प्रतिभा अशोक (नालासोपारा), श्रीपाद नारायण (कोल्हापूर), मेधा दामले (दादर)

**वर्गणीदार : हितगुज आजीव (२०००)** : उदय भास्कर (दुबई), शांताराम नारायण (बेळगावी), विंग कमांडर (नि) यशवंत लक्ष्मण (पुणे), संजय वासुदेव (इचलकरंजी), गायत्री गोविंद लेले (मिरज), धनंजय मनोहर (पुणे), शशांक श्रीधर (वेंगुर्ला), अरुण गणेश (दादर), सतीश विष्णू (पुणे), भालचंद्र सखाराम (मुटाट), मेधा हेमंत परांजपे (विलेपार्ले), अरुण चिंतामण (ठाणे), विनोद अरुण (अमरावती), अजय अविनाश (बार्शी), भालचंद्र नारायण (अंबरनाथ), भास्कर नारायण (बेळगावी), नागेश नारायण (पुणे), महेश श्रीकृष्ण (नाशिक), भानुदास मराठे (???), जितेंद्र सदाशिव जोशी (पुणे), हेमंत महादेव (विलेपार्ले), भालचंद्र दत्तात्रय (डोंबिवली), विद्याधर दत्तात्रय (बोरिवली), विनायक वासुदेव विद्वांस (बदलापूर), ऋषिकेश रघुनाथ (बेळगावी), एअर कमोडोर (नि) मधुकर कृष्ण (पुणे), जयंती शशिकांत (पुणे), मंदार विद्वांस (???).

**वर्गणीदार : हितगुज आजीव (१०००):** विजय यशवंत (डोंबिवली), श्रीपाद यशवंत (डोंबिवली), नरहर गोविंद (मालाड), डॉ. श्रीमती सीमा शाम (पुणे), दत्तात्रय कृष्णाजी (नागपूर), जयप्रकाश चिंतामण (पुणे), अपूर्वा आनंद (राजापूर), अशोक यशवंत (विलेपार्ले), उमा सदानंद (बेळगावी), सुरेश वामन (ठाणे), सुधाकर वामन (कांदिवली), अनंत सदाशिव (मुलुंड), राहुल रवींद्र विद्वांस कल्याण, प्रमोद कृष्ण (ठाणे) समीर विलास (ठाणे), नीलिमा विष्णू विद्वांस (पेण), भास्कर दत्तात्रय (मिरज).

**वर्गणीदार : आजीव सभासद :**

उदय भास्कर (दुबई), विंग कमांडर (नि) यशवंत लक्ष्मण (पुणे), डॉ. श्रीमती सीमा शाम (पुणे), संजय वासुदेव (इचलकरंजी), दत्तात्रय कृष्णाजी (नागपूर), आशिष दत्तात्रय (नागपूर), नूपुर प्रशांत (अहमदाबाद), राहुल श्रीपाद (जळगाव), मंदार सुरेश खांबेटे (माहीम), शशांक श्रीधर (वेंगुर्ला), गजानन रंगनाथा (बंगळुरू), भालचंद्र सखाराम (मुटाट), मेधा हेमंत परांजपे (विलेपार्ले), अपूर्वा अरुण (गोवा), अरुण शिवराम (गोवा), कालिदास बाळकृष्ण (गोवा), सुनंदा कालिदास (गोवा), बाळकृष्ण कालिदास (गोवा), स्मिता बाळकृष्ण (गोवा), विनोद अरुण (अमरावती), अनंत वामन (अंधेरी), ऋषिकेश रघुनाथ (बेळगावी), एअर कमोडोर (नि) मधुकर कृष्ण (पुणे), प्रशांत प्रभाकर (वडोदरा), महेश पुरुषोत्तम (मोगरणे), प्रवीण पुरुषोत्तम (मोगरणे), जयंती शशिकांत (पुणे), चैतन्य अशोक खांबेटे (माहीम), ॲड. डॉ. नंदकुमार अच्युत (गोरेगाव, जि. रायगड)

# ...अथ चातुर्मासारंभ

**भा**रतीय संस्कृतीचे, प्राचीन परंपरेचे गेल्या काही शतकांपासून उत्सवांत रूपांतर झाले आहे. प्रत्येक सण आणि परंपरा कुठल्या ना कुठल्या देवदेवता, पूजा-अर्चा यांच्याशी संबंधित असून धार्मिक प्रथा, परंपरा, रूढी यांतून हिंदुस्थानातील प्रत्येक जाती-जमातींनी आपले देव, सण, परंपरा, व्रतवैकल्ये जपली आहेत. एकाच वेळी अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर समूहाने होणारे हे उत्सव आता 'महोत्सव' होऊ लागले आहेत. सर्व भारतीय देवदेवता, मानवी भावभावना या वृत्ती-प्रवृत्ती यांच्याशी निगडित आहेत. अशाच परंपरेतील 'चातुर्मास' हा एक व्रतोत्सव आहे. आषाढ शुद्ध एकादशीपासून कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत अथवा आषाढ शुद्ध पौर्णिमा ते कार्तिक शुद्ध पौर्णिमा हा काळ चातुर्मास म्हणून ओळखला जातो.

मानवी एक वर्षाचा कालावधी हा देवांचा एक अहोरात्र कालावधी असतो. दक्षिणायन ही देवांची रात्र असून उत्तरायण हा दिवस असतो असे मानतात. कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होते व दक्षिणायनास प्रारंभ होतो. कर्क संक्रांत आषाढ महिन्यात येते. म्हणून या आषाढातील एकादशीला 'शयनी' म्हणजे झोपलेली एकादशी म्हणतात, कारण त्या दिवशी देव झोपी जातात अशी समजूत आहे. कार्तिक एकादशीला देव झोपून उठतात म्हणून तिला 'बोधिनी अथवा प्रबोधिनी' एकादशी म्हणतात.

वास्तविक दक्षिणायन सहा महिन्यांच्या कालावधीचे असून, देवांची रात्र तेवढीच असायला हवी. परंतु बोधिनी एकादशीपर्यंत चार महिन्यांचा कालावधी होतो. याचा अर्थ रात्रीचा एक तृतीयांश कालावधी शिल्लक आहे तोच देव जागे होऊन आपले व्यवहारकार्य पूर्ववत सुरू करतात.

देवांच्या या निद्राकाळात असुर प्रबल होतात व मानवांना त्रास होऊ लागतो अशी आख्यायिका आहे. या असुरांपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने काहीतरी व्रत करावे असे शास्त्र सांगते. अन्यथा संवत्सरोद्भव असे पातक लागते. देव झोपी जातात, त्या काळात सृष्टीचे जतनसंवर्धन करण्याची जबाबदारी मानवांकडे येते, असाही भाव असेल.

या चातुर्मासात प्राण्यांच्या अस्थींचा चुरा, चर्मपात्रातील उदक, इडलिंबू, म्हाळुंग, वैश्वदेव विष्णूला अर्पण न केलेले अन्न, मसूर, पांढरे पावटे, अभक्ष्य भोजन, घेवडा, चवळी, लोणी, वांगी, कलिंगडे, बहुबीज, मुळा, कोहळा, बोरे, आवळे, चिंच, कांदा, लसूण हे पदार्थ वर्ज्य आहेत. त्याचप्रमाणे मंचकावर शयन, ऋतुकाळावाचून स्त्रीगमन, परान्न या बाबी वर्ज्य मानल्या आहेत. चतुर्मासात हविषान्न सेवन करावे. तांदूळ, मूग, जव, तीळ, वाटाणे, गहू, समुद्रातील मीठ, गायीचे दूध, दही, तूप, फणस, आंबा, नारळ, केळी हे पदार्थ वर्ज्य मानले नाहीत. कित्येक भगिनी चतुर्मासात 'धरणे पारणे' नावाचे व्रत करतात. एक दिवस भोजन, दुसऱ्या दिवशी उपवास. काही जणी एक ते दोन धान्यावर राहतात. काही एकभुक्त राहतात.

वैष्णवभक्त आषाढी-कार्तिकी एकादशीला तप्तमुद्रा धारण करतात असे उल्लेख 'रोमार्चन चंद्रिका' ग्रंथात आढळतात. तप्तमुद्रा संदर्भाने अनेक जाणकारांनी भाष्य केले आहे. तथापि शिष्टाचाराप्रमाणे यांची व्यवस्था असावी असे मार्गदर्शन 'धर्मसिंधू' ग्रंथात आढळते.

चातुर्मासात यतीला केशवपन वर्ज्य सांगितले आहे. विशेषत: विविध आचार्य, शंकराचार्य पीठाधीश यांना चार महिने, दोन महिने एकाच जागी राहण्याचे उल्लेख धर्मग्रंथात आढळतात.

चातुर्मासातील चातुर्मास्य यागात वैश्वदेव, वरुण प्रघात, साकमेध व सुनाशिरीय अशी चार पर्वे असतात. ही चार पर्वे एकदम करण्याची पद्धत रूढ आहे. वैश्वदेव चैत्र पौर्णिमेला, प्रघात व साकमेध श्रावण व मार्गशीर्ष पौर्णिमेला येतात. सुनाशिरीय पर्व आपल्या इच्छेनुसार करावे. हा चातुर्मास याग करताना प्रथम वैश्वानर व पर्जन्य यांना उद्देशून एक इष्ठी करावी असे उल्लेख आश्वलायन ग्रंथात आढळतात.

श्रावण महिन्यात पालेभाज्या, भाद्रपद महिन्यात दही, आश्विन महिन्यात दूध व कार्तिक महिन्यात द्विदल धान्ये वर्ज्य करावयाची असतात. याला 'चातुर्मास्य व्रत' म्हणतात. वैष्णव आणि शैव यांची चातुर्मास्य व्रते विष्णू आणि शंकर यांच्या पूजेने होतात. विष्णुपूजेला जाईचे फूल आवश्यक असते. चातुर्मास्य व्रत पूर्ण होताच कार्तिक पौर्णिमेला व्रतोद्यापन करतात.

पार्श्वनाथ या जैन धर्मीय तेविसाव्या तीर्थंकराने प्रसारित केलेल्या चार यामांना चातुर्मास्य धर्म म्हणतात. या चातुर्मास्याचे उल्लेख पाली वाङ्मयात आढळतात. या

धर्माचा उल्लेख वेद-उपनिषदांच्या पूर्वीही भारतात होता. जैन पंथीय पहिला ऋषभनाथ व शेवटचा महावीर हे दोघे सोडून बावीस तीर्थंकरांनी चातुर्मास्य धर्माची प्ररूपणा केली असे उल्लेख केशी-गौतम संवादात उत्तरायण सूत्रात आढळतात.

या चातुर्मासात बैलपोळा, पिठोरी अमावस्या, मंगळागौरी, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, गोकुळाष्टमी, जिवत्यागान, नरसोबा, गणेशचतुर्थी, ऋषिपंचमी, विजयादशमी, दीपावली, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज, तुलसीविवाह, वैकुंठ चतुर्दशी, त्रिपुरी पौर्णिमा आदी महत्त्वाचे सण येतात.

त्यामुळे मराठी सारस्वतात चातुर्मासाला अधिक महत्त्व आहे. चातुर्मास हा भारतीय संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. सर्व भारतीय देवदेवता या मानवी भावभावना आणि वृत्ती-प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. त्यामुळे या सर्व रूढी, परंपरा, प्रथा लोकजीवनात रुजल्या आहेत. चातुर्मास्य व्रत त्यातील एक घटक असून ते लोकाभिमुख आहे.

– **नंदकुमार मराठे,** (पृ.२१९)
बाबूजमाल दर्ग्याजवळ, कोल्हापूर
भ्रमणध्वनी – ९९६०६३६०४०

# वाचकांचा पत्रव्यवहार

माननीय,

हितगुजचा १०० वा अंक खूप आवडला. त्यातील लेख-कथा वगैरे सर्व काही संग्राह्य आहे. या अंकासाठी आपण खूप मेहनत घेतली आहे. आपण सर्व प्रकारे प्रतिकूल परिस्थितीत काम करता आहात हे सर्वांना माहीत आहे. त्या दृष्टीने तुमची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. अंकाच्या शेवटी छापलेला संत-कवयित्रीवरील तुमचा लेख तर मी खूप वेळा वाचला व परत वाचावासा वाटतो. अवीट गोडीचा विषय आणि तुम्ही केलेली सुबक मांडणी यांचा हा परिणाम आहे.

**मला दोन-तीन सुधारणा सुचवायच्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –**

१) चित्रकाराने केलेली कलाकारी (Artwork) डोळे झाकून घेऊ नका. मुळाक्षरांची मूळ रचना न बदलता चित्रकाराने कलाकारी करावी. मुखपृष्ठावरील हितगुज या मुख्य शब्दात दोन चुका आहेत. 'त'चे वळण चुकीचे आहे. ते वरच्या ओळीतील 'त' सारखे हवे. ग चा ऱ्हस्व उकार चुकला तो बाजूला छापलेला मुखपत्रातील 'मु' प्रमाणे पाहिजे. 'डिसेंबर २०१४' हे मुखपृष्ठावर कुठेही नाही.

२) सर्व लेखकांचे फोटो-पत्ते-फोन नंबर लेखासोबत द्यावेत. मराठे कुलवृत्तान्त कोणी टेबलावर नेहमी ठेवत नाही.

३) सर्व लेखांची अ, ब आणि क अशी वर्गवारी करावी. 'अ' लेखांना आणि 'ब' लेखांना प्रत्येकी किमान रु. १००० व रु. ५०० अशा प्रकारे मानधन द्यावे. माझ्या मते खालील आठ लेख 'अ' वर्गात आहेत :-

• ब्रह्मर्षी स्वामी, • अदलाबदल, • मुलाखतीची मुलाखत, • European Reminiscences, • अभागी यमुना, • शतजन्म, • प्राचीन मराठी संतकवयित्री, • वास्तुकथा,

पुढील सहा लेख 'ब' वर्गात आहेत.

• बोडण, • प्रेमळ पित्याचे पुण्यस्मरण, • नशीब आणि विचारस्वातंत्र्य, • जीवन जगण्यासाठी गीता, • PKM Lecture, • निवृत्ती

वर्गवारी तुम्ही तुमच्या मते बदलू शकता. पण मानधन देणे हे महत्त्वाचे आहे. वरीलप्रमाणे मानधन देण्याचा आपण निर्णय घेतला तर फक्त रु. ११००० खर्च होतील. हे पैसे तुम्ही आपल्याच माणसांना देत आहात. त्यांनी चांगले काम केले म्हणून देत आहात. सन १९८१ ते सन २०१४ या ३३ वर्षांच्या काळात हा खर्च म्हणजे काहीच नाही. प्रतिष्ठानची सध्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे त्यावर हे सर्व अवलंबून आहे. यासाठी काही मदत करता आली तर मी जरूर करेन.

मार्च २०१५ चा अंक चांगला आहे – म्हणजे दिसायला चांगला व वाचनीय आहे. या अंकासाठी चित्रकाराने कमाल केली आहे. त्यांनी या अंकाचे नाव 'हितगुज' असे बदलले आहे. गुचा उकार बरोबर आहे, पण ज चुकवला आहे. शुद्ध मराठी बोलणाऱ्या आणि शुद्ध मराठी लिहिणाऱ्या कोकणस्थ ब्राह्मणांचे हे मुखपत्र आहे हे त्या चित्रकारांना माहीत नसावे. अंकात कार्यक्रमांचे दोन फोटो आहेत. पण त्यांचा दर्जा चांगला नाही. प्रत्येक अंकातील लेखांना आपण किमान प्रत्येकी रु. ५०० मानधन द्यावे.

– **शरद कृष्णाजी मराठे,** (पृ. ४३) पुणे
कॉस्ट अकाउंटंट,१०२, भगवती कृपा नं. २, राजाजी रोड,
डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१ २०१

# खुळी

आयुष्यात आपण आपल्या माणसांवर जिवापाड प्रेम करतो. मुलांना अपार माया देतो. पशुपक्ष्यांवर, वृक्षवेलींवर, निसर्गावर प्रेम करतो. पण एखाद्या निर्जीव वस्तूवरसुद्धा आपण एवढा जीव लावू, लळा लावू, की ती सजीव चैतन्य व्हावी? आणि तिच्या जाण्याने मन खंतवावे, हुरहुरावे, झुरावे, चुटपुट लागावी? आणि तिच्या बाबतीत नेमके तसेच झाले. जग तिला 'खुळी' म्हणेल कदाचित, पण त्या खुळेपणातला आनंद तिला उमगला आहे.

त्याचे काय झाले, अचानक त्याने सांगितले, स्कूटर विकली म्हणून! तिला फार वाईट वाटले. एखादे घरातले जिवाभावाचे माणूस जावे त्याप्रमाणे. पण इतकी अचानक ती जाईल अशी ध्यानीमनी कल्पना नव्हती. त्याच्या जवळच्या मित्राने तिला एकदा रस्त्यात हटकून विचारले, 'स्कूटर विकायची आहे का? माझा मित्र घेईल विकत.' त्यावर तिने सध्या त्याचा विचार बदलला आहे, इतक्यात विकायची नाही असे खोटेच सांगून स्कूटर वाचविली होती. २-३ महिन्यांपूर्वी त्याने मेकॅनिकला सांगितलेले असते, एखादे चांगले गिऱ्हाईक मिळाले तर विकून टाकायची आहे म्हणून! आताशी स्कूटर थकली होती. बऱ्याचदा रिपेअर करायला लागायची, सुरू करायच्या आधी कुरकुरायची.

सकाळी मुलाला शाळेत सोडले आणि मेकॅनिककडे स्कूटरला नेऊन ठेवले. तिला बघायला येणार होते. त्यांनी ताबडतोब पसंत करून घेऊनच टाकली. तिची कल्पना होती रात्री स्कूटर घरी येईल, तो तिला नेहमीप्रमाणे पांघरूण (कव्हर) घालून वर येईल, झोपायच्या आधी ती खिडकीतून खाली वाकून पाहील, पांघरूण जागेवर आहे ना, वाऱ्याने उडविले तर नाही ना, त्याला सुखरूप घरी आणल्याबद्दल स्कूटरजवळ कृतज्ञता व्यक्त करील.

तिला वाटले, इतकी अचानक जायला नको होती! शेवटचा निरोपसमारंभ झाला नाही. पुन्हा वाटले, अचानक गेली तेच बरे झाले. जड अंतःकरणाने आम्ही निरोप देऊ शकलो नसतो. स्कूटर गेली त्या रात्री तोही अस्वस्थ, बेचैन, झोप लागेना, त्याला इतक्या वर्षांची सवय झालेली, सोबतच होती त्याची. सिनेमातील गरीब आई-वडिलांच्या पोराला मुलं नसलेले, पण श्रीमंत दांपत्य त्यांच्या घरी घेऊन जातानाचा प्रसंग तिच्या डोळ्यांपुढे उभा राहिला.

तिला प्रथम स्कूटर दुकानातून पहिल्यांदा घरी आली तो दिवस आठवला. त्याला धड चालविताही येत नव्हती फारशी; तरी मोठ्या आनंदाने, आत्मविश्वासाने, एखाद्या लहान मुलाने त्याच्याहून लहान असलेल्या भावंडाला उचलावे तशी स्कूटरला तो घेऊन आला. छोट्या मुलाला वाढदिवशी नवीन खेळणे मिळाल्यावर जसा आनंद होतो तसाच आनंद त्याच्या डोळ्यांत लकाकत होता. शाळेतून घरी आलेल्या मुलाने पाटीदप्तर फेकून धावत 'आई' अशी हाक मारून आगमनाची वर्दी द्यावी तशी स्कूटरने हॉर्न वाजवून ती आल्याचे सांगितले.

तिने लगेच वरून तिसऱ्या मजल्याच्या खिडकीतून खाली पाहिले. सर्व जण उत्सुकतेने जिची वाट पाहत होते, ती स्कूटर दारात ठुमकत उभी होती. तिची लगेच धांदल उडाली. घरात गौरी आल्यावर त्यांचे स्वागत जसे करावे त्याप्रमाणे तिने स्कूटरला ओवाळून हळद-कुंकू लावले, फुलांचा भरीव, घसघशीत हार घालून स्वागत केले. नमस्कार करून डोळे मिटून मनातून प्रार्थना केली, त्याला - तिच्या जिवलग जोडीदाराला - सांभाळून आण गं बाई! जपून आण, त्याचे जीवित तुझ्या हाती, काळजी घे.

डोळे उघडले तेव्हा स्कूटर गालातल्या गालात हसल्यासारखी वाटली.

हळूहळू जसे दिवस जात होते तशी त्याला स्कूटरची सवय होऊ लागली. स्कूटरवर त्याची चांगली 'मास्टरी' झाली. त्याचा स्कूटरवरचा विश्वास वाढला. त्याबरोबर तो तिला व मुलाला घेऊन रोहा व कर्नाळा अभयारण्याला जाऊन आला. स्कूटरच्या वाढदिवशी न चुकता ती स्कूटरला हार घालायची आणि महालक्ष्मीच्या दर्शनाला स्कूटर त्यांना घेऊन जायची. स्कूटरही चिक्कार हिंडली होती. पनवेलजवळील नेरे येथील शांतिवन, कल्याण, ठाणे, घाटकोपर, कुर्ला, चेंबूर, सायन ते व्ही. टी. आणि चर्चगेट ते बोरिवलीपर्यंत, नवी मुंबईसुद्धा. एखाद्या टॅक्सीनेसुद्धा जितकी पालथी घातली नसेल तितकी स्कूटरने मुंबई पालथी घातली होती. मुंबईचा कानाकोपरा तिला माहीत झाला होता.

या १५ वर्षांत कितीतरी माणसांना तिने वाहून नेले होते. विविध प्रकारची माणसे, नात्यातली-गोत्यातली, पै-पाहुणे, कोणी योगतज्ज्ञ, योगशिक्षक, कोणी डॉक्टर, वकील, लेखक, विचारवंत, खेळाडू, नट, गायक, शिपाई-कारकुनापासून गरजू पेशंटपर्यंत! राजकीय

पुढाऱ्यांपासून मात्र स्कूटर अलिप्त राहिली. स्कूटरला त्यांचे वावडे होते असे नाही. ती तर हिंदू संस्कृतीप्रमाणे सर्वसमावेशक होती. तिच्याजवळ भेदभावही नव्हता, 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत' अशी स्कूटरची वृत्ती होती.

एखादी जाडी, लठ्ठ व्यक्ती स्कूटरवर बसली की तिला जड ओझे वाहणारा, दमछाक करीत रेटत जाणारा हातगाडीवाला हमाल दिसायचा. ती कासावीस व्हायची आणि स्कूटरची कीव करायची. ती स्वतः खूप बारीक, वजनाने हलकी असल्याने ती मागे बसल्यावर स्कूटर अशी काही वेगाने धावायची की जणू आकाशात उडणारे विमानच! पोटातले पाणीसुद्धा हलायचे नाही, इतका तो छान चालवायचा. तिलाही अलगद वाटायचे. त्यानेही स्कूटरशी कधी वेडीवाकडी मस्ती केली नाही. तो त्याचा स्वभावच नव्हता. जरा स्कूटरला काहीतरी होतंय, स्कूटरचे काहीतरी बिघडल्यासारखे वाटले की ताबडतोब स्कूटरला डॉक्टर (मेकॅनिक) कडे घेऊन जायचा. आजार मामुली, किरकोळ असला तर लगेच स्कूटर बरी होऊन घरी यायची.

पण आजार जास्त मोठा गंभीर असला तर स्कूटरला हॉस्पिटलात (गॅरेजमध्ये) राहावे लागायचे. तेव्हा त्याला आणि तिला चुकल्यासारखे वाटायचे. स्कूटर बरी होऊन घरी आली की ताजीतवानी होऊन सुसाट धावायची. असे वाटायचे की जणू स्कूटरला सांगायचे आहे, 'पाहा, माझी तब्येत कशी ठणठणीत झाली ती. आता मला काहीसुद्धा होणार नाही.'

रात्री ९ वाजल्यापासून तिचे कान स्कूटरचा परिचित हॉर्न ऐकण्याकडे असत. तो हॉर्न म्हणजे त्याच्या आगमनाची वार्ता तिला आनंद देई. हॉर्न ऐकताच ती एखाद्या नवविवाहित नवोढेसारखी खिडकीत डोकावायला जायची.

त्या दोघा नवराबायकोंप्रमाणेच त्यांच्या मुलालाही स्कूटरविषयी खूप आपलेपणा, जिव्हाळा वाटायचा. स्कूटरला आंघोळ घालून स्वच्छ पुसायचे काम तो मोठ्या हौसेने करायचा. आजोबांनी मोठ्या प्रेमाने नातवाला खांद्यावर घ्यावे आणि नाचावे त्याप्रमाणे तो पुढे उभा राहायचा तेव्हा स्कूटर डौलात, खुशीत धावायची. नंतर काही वर्षांनी तिला मुलगी झाली. महिन्याच्या मुलीला घेऊन ती स्कूटरवर प्रथम बसली, तेव्हा तर स्कूटर लेकुरवाळीच झाली.

पावसाच्या सरीमागून सरी याव्यात तशा एकामागून एक येणाऱ्या सर्व आठवणींनी ती व्याकूळ झाली. तिच्या मनात आले, वस्तूची उपयुक्तता संपली की तिला टाकून द्यायचे? टाकाऊ ठरवून मोकळे व्हायचे? म्हाताऱ्या आई-वडिलांना, वृद्ध सासू-सासऱ्यांना टाकते का कोणी?

म्हातारी, दूध न देणारी भाकड म्हैस बारकूने तिला विकू दिली नव्हती. हे बालपणीचे तिला आठवले.

तिनेही नवीन स्कूटरला ओवाळताना ठाम निश्चय केला, स्कूटरला पुष्कळ वर्षे झाली, अगदी चालेनाशी झाली तरी तिला टाकून म्हणून द्यायचे नाही, दुसऱ्याकडून पैसे घेऊन तिला विकायची नाही!

परंतु मनातले सर्वच निर्णय खरे झाले तर मग सुखाला दृष्ट नसती का लागली? अर्थात, तिचे दुःख इतरांना तीव्रतेने जाणवणार नाही. 'जुने' वाहन विकून 'नवे' घेणाऱ्या व्यवहारी माणसांना तर अजिबात नाही! ही माणसे तिला म्हणणार खुळीच!

**– डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**
(पृ. १२०), वडाळा
दूरध्वनी : २४१५०८८९

## कळकळीची विनंती

बँकांमध्ये CBS प्रणाली लागू झाल्यानंतर सभासद व देणगीदार प्रतिष्ठानला देय रक्कम IDBI बँकेच्या कोणत्याही शाखेत 'मराठे प्रतिष्ठान' नावाने IDBI बँक, दादर (प) शाखेत असलेल्या बचत खाते क्र. ०५०११०४०००४३५१९ मध्ये परस्पर जमा करू शकतात. परंतु अशा रीतीने रक्कम जमा केल्यावर त्याविषयी माहिती म्हणजे जमा करणाऱ्याचे नाव व पत्ता, दिनांक, रक्कम, कशी, कोठे व कशासाठी जमा केली, चेक/ NEFT क्र. प्रतिष्ठानला न कळविल्यास पावती देणे कठीण होते. अशा ५ Unreconciled रकमा पुढीलप्रमाणे.

सारस्वत बँक, वरळी : ७ जुलै १४ : रु. २००/–, ३ डिसे. १४ : रु.२०००/–, ३ जाने. १५ : रु.२५००/–,
१८ मार्च १५ : रु. २०००/–

IDBI बँक, दादर (प) : २५ फेब्रु. १५ : रु. २०००/–

सर्वांना विनंती ही की अशा रीतीने रक्कम जमा केल्यास उपर्निर्दिष्ट माहिती कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास मराठे यांस कळवावी.
भ्रमणध्वनी: ९८३३२१६४६८ इमेल : shriniwas_marathe@yahoo.com

**यापूर्वीच कळवल्याप्रमाणे सारस्वत बँक, वरळी येथील खाते ३१ मार्च रोजी बंद केले आहे याची नोंद घ्यावी.**

# आर्थिक साक्षरता वाढवील गोडी

– जयंत मराठे, पुणे 1544@indiatimes.com

**आ**र्थिक साक्षरतेची व्याख्या करणे सोपे आहे. साक्षर म्हणजे ज्याप्रमाणे लेखन, वाचन करता आले पाहिजे व शुद्ध बोलण्याचा प्रयत्न तसेच अर्थ म्हणजे आयुष्य जगण्यासाठी किंवा जगण्याला अर्थ निर्माण करण्यासाठी जो पैसा लागतो त्याबद्दल लेखन, वाचन नव्हे तर तो हाताळण्यासाठीचे ज्ञान म्हणजे आर्थिक साक्षरता म्हणता येईल.

धन किंवा पैसा याचा मोह प्रत्येकाला असतो. पण त्याची हाताळणी, सुरक्षित गुंतवणूक याबाबत कितीजण माहीतगार असतात? कारण असे जर असते तर नोटा दुप्पट करून देण्याच्या आमिषाला चांगले सुशिक्षित लोक बळी पडले नसते. साधी गोष्ट आहे. दहा रुपयाचे वीस रुपये नुसते कागदात गुंडाळून कोण कसे करू शकेल? आणि हे करण्याचे शास्त्र ज्याला अवगत असेल तर तो ही जादू (खोटी) करायला का भटकतो? मग बातमी येते 'नोटा दुप्पट करण्याच्या आमिषाने फसविले' किंवा 'नोटा दुप्पट करून देतो सांगून गंडविणाऱ्या टोळीस अटक' या बातम्या आपणांस आपली आर्थिक निरक्षरताच दाखवितात. हीच गोष्ट सोने दुप्पट करून देण्याबाबत किंवा पॉलिश करून देण्याबाबत असते. असे घडणे शक्य नाही, हे काहींच्या लक्षातच येत नाही. आताची वरील उदाहरणे ही साधारणतः अशा स्त्री-पुरुषांची की ज्यांना आर्थिक घडामोडींची माहिती नसते व त्यांचे उत्पन्न किंवा हाताशी असलेले धन सतत अपुरे पडते त्यामुळे वरील प्रकारच्या भूलथापांना बळी पडतात.

धुणी-भांडी करणाऱ्या कामकरी महिला, भाजी विकणारे हातगाडीवाले/ठेलेवाले/भंगार गोळा करणारे व काटकसरीने मर्यादित उत्पन्नात घर चालविणाऱ्या महिला हे लोक चिटफंड, भिशी अशांच्या योजनात पैसे टाकतात. पण या संस्थांना व त्यातील गुंतवणुकीस कोठलेही संरक्षण नसते. एके दिवशी चिटफंडचे कार्यालय उघडतच नाही, आणि पैसेही जातात. पण अशांपैकी काहींना बँकेच्या पिग्मी ठेवी गोळा करणारा मनुष्य किंवा पोस्टाचा सी.टी.डी. गोळा करणारा एजंट भेटतो जो त्यांना एकप्रकारे अर्थसाक्षर करतो. हे प्रतिनिधी त्यांच्या घरोघरी जाऊन ठराविक रक्कम गोळा करून ते पैसे त्यांच्या खात्यात भरतात आणि ठराविक मुदतीनंतर त्या खातेदारांना त्यांच्या भरलेल्या रकमेपेक्षा व्याजासह मोठी रक्कम मिळते. आता याउलट भरघोस व्याज शिवाय एखादी गिफ्ट देण्याच्या बहाण्याने कित्येक पतसंस्थांनी सामान्य माणसांना – त्यात सगळे आले, अर्धशिक्षित, शिक्षित व अतिशिक्षित – पार भुईसपाट करून टाकले आहे. भूदरगड पतसंस्थेतील गुंतवणूकदार किंवा तशाच इतर अनेक बुडीत पतसंस्थांच्या बाबतीत हे घडले आहे. येथे ठेवीदारांना विम्याचे संरक्षण नव्हते व आजही नाही, पण हे माहीत करून घेणे, जाणून घेणे म्हणजेच अर्थसाक्षरता. शिकलेला वाचता येणारा माणूस काही वेळेस, कोणाच्या तरी सांगण्यावर विश्वासून महत्त्वाच्या कागदपत्रांवर बिनधास्त सह्या करतो व पुढे गोत्यात येतो. कारण वाचायला येत असूनही तो आपण कशावर सह्या करतोय ते वाचत नाही. पैसा गुंतवायचाय पण कुठे? त्याची नीट माहिती करून न घेता एखाद्याच्या विश्वासावर पैसे गुंतवायचे म्हणजे आर्थिक समाजाच्या दृष्टीने निरक्षरच होय.

साक्षरतेचे उद्दिष्ट होते आणि आहे, सामान्यांच्यात जागृती व त्यांना विचार करावयास लावण्याचे. कारण त्यामुळे योग्य, अयोग्य, बरोबर, चूक याबाबत बुद्धि योग्य निर्णय संस्काराने देते. आर्थिक साक्षरता ही अशीच महत्त्वाची आहे. कारण घरातील आर्थिक बाबींचे नियोजन योग्य करता आले तर तो अगर ती इतर जिथे जिथे जातील त्या संस्थांतून अगर शेजारी, मित्रमंडळींतही आर्थिक समस्यांबाबत योग्य सल्ला व मार्गदर्शन करणारच. कारण साक्षरतेमुळे व साक्षरतेच्यावर पुढील संस्कारामुळे देशास योग्य व कर्तृत्ववान नेतृत्व मिळू शकते. तसेच अर्थसाक्षरतेमुळे राष्ट्राचा बचत दर, उत्पादन क्षेत्रातील उत्पादन खर्च, आयात-निर्यात या सर्व परस्पर पूरक बाबी यांचे योग्य नियोजन होऊ शकेल. त्यासाठी मुळात प्रत्येकाला आपण काय मिळवतो व काय खर्च करतो याचा योग्य विचार करण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. बहुतेकांना आर्थिक घडामोडी, उत्पादन खर्च, किमती, गुंतवणूक, बचत हे शब्द रूक्ष वाटतात. पण पेट्रोलचे भाव वाढले, डाळी महागल्या, भाज्यांचे भाव आवाक्याबाहेर गेले की याबाबत ही मंडळी मात्र अगदी रस्त्यावर येऊन बंद पाळून संताप व्यक्त करतात. पण तारतम्य विचारसरणी ठेवून यात आपला प्रत्येकाचा संबंध आहे हे लक्षात येत नाही. यासाठी आर्थिक साक्षरता पाहिजे. आता कोणी असेही म्हणेल की अमेरिका इतका संपन्न देश तेथे कशी काय मंदी

आली आणि युरोपातील अनेक राष्ट्रे कर्जबाजारी कशी काय झाली? तेथे तर लोक सुविद्य आहेत आणि पक्के बनिये व्यापारी आहेत.

त्यांच्याकडून आम्ही अर्थशासस्राचे धडे घेतो. मग अर्थसाक्षरतेच्या पुढच्या टप्प्यावर असलेल्या या संपन्न राष्ट्रात असे का व्हावे तर त्याचे उत्तरही अर्थसाक्षरतेच्या पायाभूत तत्त्वापासून ती राष्ट्रे दूर गेली. सब प्राईम म्हणजे दुय्यम दर्जाची कर्जे व राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा अनेक पटींनी काढलेली कर्जे ही त्याची कारणे आहेत.

अनेक कंपन्या सेबीच्या मान्यतेने निघतात. पुढे बीएसइ/एनएसइ वर नोंदवल्या जातात. शेअर इश्युतून पैसे कमवतात काही वर्षांनंतर त्या 'व्हॅनिश' होतात. नाहीशा होतात. सामान्य माणसाचे पैसे बुडतात. मध्यंतरी प्लँटेशन कंपन्या आल्या. गुंतवणूकदारांना झाडे व जमीन मिळणार या आश्वासनावर/रंगीबेरंगी जाहिराती यामुळे गुंतवणूकदार भुलले. आज ना झाड ना जमीन. कंपनीच हवेत विरघळून गेली.

कर्जे उदंड झाली. हप्ता कमी झाला व व्याजदर कमी झाला म्हणून कोणी कर्जबाजारी होऊ इच्छिणार नाही. कारण आपले उत्पन्न व कर्ज यात मेळ कसा घालायचा हे आर्थिक साक्षरतेमुळे समजेल. मागे रिझर्व्ह बँक गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांनी मध्यमवर्गीयांनी कर्जाच्या सापळ्यात अडकू नये पण कर्ज घेण्यास हरकत नाही, असे मत व्यक्त केले होते. याचा नेमका अर्थ त्यांनाच लक्षात येईल की जे दैनंदिन अर्थव्यवहाराबद्दल जागरूक आहेत.

आजही काही मध्यमवर्गीय घरांतून गृहिणी दर गुरुपुष्याला एक ग्रॅम/अर्धा ग्रॅम सोने घेत राहतात. त्यांच्यापुढे उद्दिष्ट असते. मुलीच्या लग्नाच्या वेळच्या सोन्याच्या दागिन्याचे. या गृहिणीही एक प्रकारे आर्थिक साक्षरतेचे उदाहरणच आहेत. कारण त्यांना व्हिजन आहे. दूरदृष्टी आहे.

आपला देश इमर्जिंग इकॉनॉमीमध्ये सगळ्यांच्या गुंतवणुकीचे लक्ष बनलाय. पण आपण देशवासीयांनी येणाऱ्यांना तपासून घेऊ या व देशांतर्गत अर्थसाक्षरतेवर न थांबता अर्थक्रांती प्रस्ताव (www.arthakranti.org) काय आहे आणि त्याचे निकष समजावून घेऊया.

(लेखक निवृत्त बँक कार्यपालक आहेत.)

**– जयंत रघुनाथ मराठे,**
(पृ. ५१०), पुणे
०२०–२४ ४४११११७

# • वाचकांचा पत्रव्यवहार •

माननीय महोदया,

हितगुजचा १०० वा अंक पोचला. देखणा, सुंदर अंक!

'वास्तुकथा' या लेखात 'सर्वांभूती परमेश्वर' हे तत्त्व सौ. नीलिमाताईंनी अत्यंत भावस्पर्शी लिहिले आहे. फारच सुरेख वाचताना अश्रूंना आवर घालावा लागला.

अच्युत चक्रदेवांचे विडंबनगीत उत्कृष्ट विनोदी! वाह!

मा. सुरेश खरे यांचा अभिप्राय खूपच बोलका व उत्साहवर्धक आहे.

'तूच लढायला हवेस' ही सुनीती मराठे यांची कविता भेदक आहे. वास्तवाला स्त्रीने लढूनच तोंड द्यायला हवे.

मुलाखतीची मुलाखत ही भाऊ मराठ्यांची मुलाखत उल्लेखनीय आहे.

आपण लिहिलेला लेख 'प्राचीन मराठी संत कवयित्री' उद्बोधक व माहितीपूर्ण आहे. तितकाच रोचक आहे. त्यातील काही माहिती मला नवीन वाटली.

''शतजन्म शोधताना'' हा प्रयोग पुण्यात यानंतर होईल तेव्हा मी पाहण्याचा प्रयत्न जरूर करीन, वेळ मात्र सोयीस्कर हवी. रात्री रिक्षा मिळत नाही.

सर्वांत उल्लेखनीय लेख म्हणजे 'अभागी यमुना' हा लेख. इतका हृदयस्पर्शी लेख कालिदास मराठे यांनी सातत्याने शोध घेऊन मिळवला व हितगुजला दिला हे विशेष आहे. मी त्यांना फोन करून कळविले आहे. उल्लेख केला नसला तरी सर्व अंकच उत्तम!

एक मजेशीर कल्पना! शनिवारवाड्यासमोरील भाषणात स्वा. सावरकर म्हणाले होते की, भारताचे मंत्रिमंडळ एका रात्रीत फक्त पुण्यातून निवडले जाऊ शकले. मी असे म्हणू इच्छितो (काहीशा अतिशयोक्तीने) की फक्त (कवयित्री) मराठ्यांचे एक मराठी साहित्य संमेलन होऊ शकेल एक–दोन दिवसांचे! ते पुणे–मुंबई किंवा जरा दूर नागपूर–औरंगाबाद येथे भरू शकेल. त्यामध्ये चित्पावनी बोलीभाषेचा विषय मांडता येईल.

**– श्रीराम मराठे (पृ. ४३)**
३१६, चंद्रलोकनगरी, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे, पिन – ४११०३८ मोबाईल – ९६५७९९८८३४

# ALGERIAN EXPERIENCE

The People's Democratic Republic of Algeria, is a country in the Maghreb region of North Africa on the Mediterranean coast. Its capital and most populous city is Algiers. With a total area of 2,381,741 square kilometers [almost 75% of India], Algeria is the tenth-largest country in the world, and the largest in Africa and in the Mediterranean. The country is bordered in the northeast by Tunisia, in the east by Libya, in the west by Morocco, in the southwest by Mauritania, and Mali, in the southeast by Niger, and in the north by the Mediterranean Sea.

In Arabic, the word 'Sahara' means any arid waste. Desert region of Algeria is known as Algerian Sahara is located in the central and southern Algeria and covers almost 80% area of the country. It is shown in yellow fill in the map alongside.

Algeria's 998-kilometer northern border stretches along the southern edge of the Mediterranean Sea. The 96 km. long coastline of eastern Algeria between Bejaia and Jijel, which is known as Corniche Jijel, is the most beautiful in the whole Mediterranean and one of the best in the world. In the Corniche, very steep, rugged and high mountains rise right from the sea and the road is actually carved into the cliffs in the form of a 'C' or half tunnel at many places and offers a bird's-eye view of the clean, placid and blue to green waters of the Mediterranean as appearing in the photograph alongside.

Algeria was under French Colonial Rule and got her independence in 1962. However, 1n 1982 and 1983 when I visited Algeria, the French influence was continuing. Though official language is Arabic, French and Berber are widely spoken and very few understood English.

Rail India Technical and Economic Services Ltd. [RITES] – a PSU of the Government of India was already active in Algeria and had created a good reputation. The Société Nationale des Transports Ferroviaires [SNTF] - a state-owned company for railways, had invited tenders for Construction of a Railway Line from Constantine to Skikda via Ramdane in eastern Algeria and Indian Railway Construction Cop. Ltd. [IRCON] had decided to participate in the tender. A team of engineers from leading Indian constructors led by CMD of IRCON visited Algeria for site appreciation and I and my colleague were part of the team.

Most of the members of team including the leader reached Algiers via Rome on Monday 2nd November 1982. I could join them only the next day. I reached Algiers from Zurich in the afternoon and took a cab to Hotel Algiers. The cab driver told me that he will accept payment only in Algerian Dinars. Bank at the hotel told me that in Algeria, only the guests staying at the hotel could change money. I approached the Hotel reception to check in but was told that I had no reservation and the hotel was full. I tried to explain them that I was member of the IRCON Team and that my colleagues had already checked in the previous day and that the reservation had been made by RITES.Because of language barrier, he could not understand what I was trying to tell him. The cabman took me to a couple of banks but they had closed. Finally I had to go back all the way to the Airport where I could change money. The cab dropped me at the Hotel. He charged me U.S.$ 75. I again approached the reception for checking in and was told that there was no booking for me. Because of language barrier, the receptionist could not understand what I was trying to tell him At last a person sitting in the lobby came to my help. He translated my request to them. Finally they got in touch with RITES who clarified I was to share a roon with my colleague who was already staying at the hotel I was relieved to get a room key. I had travelled for almost 24 hours and was tired. From the room, I requested room service for drinking water.

Language barrier continued and finally I had to ask for Biere [Beer in French] and it was served promptly.

Next morning the whole team was to fly to Constantine in Eastern Algeria. We all had confirmed booking from India. We tried to approach the check in counter but there was no queue. The flight being a domestic flight, there was a crowd of passengers shouting and flashing their tickets. We all waited impatiently and were finally told that the flight was already full. We therefore had no alternative but to travel for about 7 hours to cover the distance of 322 km. by road.

Algerians are good boozers. Before leaving for Constantine by road we had to pick up two members who were arriving from

Delhi. While waiting at the airport, I went to the cafeteria and asked for a pint of beer. The salesman smiled at me and said 'Wahed, La, Khamsah' meaning I must take five bottles and not one. I said no and he gave me one. I then found out that every customer was picking up five bottles before sitting at the table.

Our site appreciation visit took six days during which we stayed in good hotels except on one night when we were forced to stay in a village inn. The rooms were dark and filthy. The toilet had probably not been flushed for days.


Police check on the highways was pretty strict. Gun totting guards, usually in pairs, stopped vehicles for inspection. While one was busy with inspection, the other had his gun pointed at the occupants, just in case. As soon as you stop, the first thing they do is to exchange greetings and after inspection they thank you and bid good bye.


We all were back in Algiers on the 9th evening. On 10th, I and my colleagues went Alitalia to make our booking as our return sectors were Algiers – Rome – Mumbai. We were told that the Rome - Mumbai flights were full for the next five days. I had a Swiss Air Ticket and my colleague had Air India Ticket. My friend who was an executive in an airline had advised that for travel to any African country via Europe, one must carry a ticketing document on a reputed European airline like Swissair or Air France and that for business trips we should not carry discounted tickets but only fully paid tickets to facilitate rerouting, when required. When Alitalia could not give us a seat, we went to Swissair. As I had a Swissair Document Swissair rerouted me to Mumbai via Zurich at no extra cost but my colleague was charged U.S.$60 for the same rerouting. Our Algiers - Zurich was on 11th evening and Zurich Mumbai was on 12th afternoon and Swissair agreed to give a free layover at Zurich. .

On the night of 9th, we all hosted a grand dinner to the top engineers of Algerian Railway. The restaurant has a fabulous seafood layout but limited choice for the vegetarians. After dinner we all moved over to a nightclub. Since we were a group of 15, scotch was ordered by bottles. The nightclub had an Egyptian Belly dancer and Khaled, who later became a famous international singer, was at the mike. It was a really memorable night which ended around 4 am.

On arrival at Zurich, I and my colleague went to collect our hotel vouchers to Hotel Continental Zurich. Cab fare was paid by hotel. My teetotaler vegetarian colleague did not have much choice at the dinner and I had a carafe of Swiss Wine and Roasted Mediterranean Fish and a Parfait for dessert. Both of us made a short telephone call to our homes and a telex to our office about our arrival. Next morning when we checked out of the hotel, the cashier told us that our allowance vouchers together were enough, not only to cover the lavish food I had but also the cost telephone calls and telex. Hail Switzerland.

My next visit to Algeria was from 25th August, 1983. I went there to gather data on the upcoming rail and road projects and ongoing railway projects. From Algiers, I travelled to Oran and stayed there for about a week, for visiting the alignments. On two occasions, we



had to take lunch in a small village restaurant. The place offered rice or Bagutte [long round French bread] with Potato Puree with beef. When we asked for vegetarian food, the man at the counter poured the upper portion from the pot excluding pieces of the meat. One of these lunches was on 30th August – my birthday.

I returned to Algiers on 2nd September to take a flight to Zurich on 3rd. I reconfirmed my seat at Swissair. However, locals advised me to be at the airport more than 2 hours before the flight. The locals also warned that you may be told that they do not have a booking for me but I should continue to wait at the counter till the boarding pass is issued. I was not surprised as my memories about the Algiers Constantine flight of the last visit were still fresh. The advice of the locals turned out to be true. Though I had a reconfirmed ticket, I was asked to wait and after a while I was called and given my boarding pass.

At the departure lounge, I got into talking with a fellow passenger. When I told him that all these days I had been out of touch with outside world as English newspapers were not available, he shocked me and told me that two days earlier i.e. on 1st September, Russians had shot down a Korean Airliner which had strayed into Russian Airspace and that World War could start any day and that he was happy that we were returning home. It was alright for him but I still had to visit Milan for two days before returning home. I was under tension but in a way I was happy that I was leaving Algeria and landing in a neutral country like Switzerland. It was a better place to get stuck. On landing at Zurich, I asked Swissair to advice me as to whether I should continue my tour via Milan or skip Milan and return to Mumbai in view of the impending war. The lady at the counter told me to cool down as the tension had eased off.

While Algeria has come a long way since the civil war in the 1990s, there are still occasional sporadic episodes of civil unrest and attacks on government establishments. Additionally, there is the threat of bandits and an al Qaeda-affiliated terrorist group (AQIM) in the south of the country. Algeria's about 40 km. wide coastal zone occupies almost 2% of the country's surface and hosts approximately half of country's population and is alright for tourists.

**- श्री. रमाकांत माधव विद्वांस**
(पृ. ६२३)
३१, गुडवील अश्युरन्स सोसायटी,
मनमाला टँक रोड, माटुंगा (प.),
दूरध्वनी – ०२२-२४३०५२६०

**BOOK POST**

**If undelivered, Please return to**

**संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१.**

**त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.**
**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१**
**दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९**
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**